दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक
# राष्ट्र सह्याद्री

अविनाश शिरसाठ
७०६६७७४४७७
गुरु एन्टरप्रायजेस
सी.सी.टी.व्ही. विक्री आणि सेवा
सी.सी.टी.व्ही. कॅमेराचे संपूर्ण समस्या खात्रीशीर सोडविल्या जातील.
इंदिरानगर, दत्त मंदिरामागे, एयरटेल टॉवर शेजारी, श्रीरामपूर-४१३७०९

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक १७ ● गुरुवार, २४ ऑक्टोबर २०२४ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००




## काय म्हणता..!

धर्मेंद्र व्यास




# मविआचा ८५-८५-८५ फॉर्मुला

## महाविकास आघाडीचा तिढा सुटला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : महाविकास आघाडीची पत्रकार परिषद खासदार संजय राऊत, बाळासाहेब थोरात, नाना पटोले, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, अनिल देशमुख, अनिल देसाई यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी संजय राऊत यांनी महाविकास आघाडीच्या जागावाटपासंदर्भात प्रश्न विचारले जायचे असं म्हटलं. मविआची बैठक शरद पवार यांच्या सोबत पार पडली. शरद पवार यांनी महाविकास आघाडीचं जागावाटप जाहीर करण्याचे आदेश दिले. मविआचे जागावाटप सुरळीतपणे पार पडलं आहे, असं राऊत यांनी सांगितलं. समाजवादी पार्टी, शेकाप यांना सामावून घेणारं जागावाटप असेल. ८५-८५-८५ असं एकूण २७० जागांवर यादी बनवलेली आहे. उरलेल्या जागांवर मित्रपक्षांसोबत चर्चा सुरु होईल. या प्रकारे २८८ जागा मविआ पूर्ण ताकदीनं लढेल,असं संजय राऊत म्हणाले. २८८ जागांचा प्रश्न सुटला असं सांगतो तेव्हा ते **(पान ४ वर)**

### ठाकरेंचे ६५ उमेदवार रणांगणात !

शिवसेना ठाकरे गटाने ६५ उमेदवारांची आपली पहिली यादी जाहीर केली आहे. पहिल्या यादीमध्ये १५ पैकी १४ विद्यमान आमदारांना पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गटाकडून संधी देण्यात आली आहे. तर अनेक नवी नावे देखील यादीत समाविष्ट आहेत.

# महायुतीने तिकीट कापलं, नाराज कोल्हेंनी दिल्ली गाठलं !

- अमित शाहांची मध्यस्थी;
- कोल्हे करणार काळेंचा प्रचार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी उमेदवारांची यादी जाहीर होताच राजी-नाराजी आणि पक्षात बंडखोरीचा सुळसुळाट सुरू झाला. महायुतीमधील तिन्ही पक्षांनी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली असून काही विद्यमान आमदारांचे तिकीट कापण्यात आले आहे. तर महायुतीमध्ये इच्छुक भाजपा उमेदवाराला केवळ राष्ट्रवादीचा विद्यमान आमदार असल्याने तिकीट मिळाले नाही. त्यामुळे, भाजपचे इच्छुक नेते नाराज झाले. अहील्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसला जागा सोडण्यात आल्याने येथील मतदारसंघातून इच्छुक असलेल्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी थेट दिल्लीच गाठली. विवेक कोल्हे यांच्यासह त्यांनी अमित शाहांची भेट घेतली. **(पान ४ वर)**

### लोकसभा निवडणुकांवेळीही नाराजी

लोकसभा निवडणुकांवेळीही भाजपच्या माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी नाराजी दर्शवली होती. त्यावेळी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि स्नेहलता कोल्हे यांची शिर्डीत बैठक झाली. अनेक दिवसांपासून स्नेहलता कोल्हे या पालकमंत्री राधाकृष्ण विखेंवर नाराज असल्याचे पाहायला मिळायला मिळाले होते. त्यामुळे, कोल्हे या शिर्डी लोकसभेचे शिवसेना महायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारात दिसल्या नाहीत. मात्र, मुख्यमंत्री शिंदेंसोबत बैठक झाल्यानंतर त्यांची नाराजी दूर करण्यात आली होती. यावेळीही, देवेंद्र फडणवीसांनी मध्यस्थी केली होती.

# रस्त्यांमुळे सण-उत्सवाच्या आनंदावर विरजन!

करण नवले । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : रस्त्याचे कामामुळे नागरिक खूश होण्याऐवजी दुःखी झालेले आहेत. विशेष म्हणजे ही सर्व कामे सण-उत्सावाच्या धामधुमीत सुरु करण्यात आलेले आहेत. त्यामुळे या सर्वच सण-उत्सावावर या कामामुळे पाणी फेरले गेले आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधीसह प्रशानावर नागरिकांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.रस्त्याची कामे झाल्याने नागरिक खूश झालेले नाहीत. उलट ही कामे सुरु झाल्यापासून शहरातील प्रत्येकजण नाराजी व्यक्त करीत आहे. गणेशोत्सव, नवरात्रोत्सवावर या रस्त्याच्या कामाने विरजन पडलेला आहे. अनेकांना त्याचा मनस्ताप सहन करावा लागलेला आहे. आताही तीच परिस्थिती आहे. त्यामुळे दिवाळीस सणाच्या धामधुमीत नागरिकांना धूळीचा सामना करावा लागत असून वाहतूक कोडीत रोजच अडकावे लागत आहे. **(पान ४ वर)**

**विकास नव्हे मन:स्ताप**
**भाग : ६**



### 'सोशल'वर कामाची खिल्ली

शहरात रस्त्याची कामे एकाच वेली सुरु आहे. त्यामुळे सर्वत्र वाहतुकीची कोंडी हो आहे. तसेच धूळीचे साम्राज्य निर्माण झालेले आहे. या धुळीच्या लोटीचे व्हीडीओ करून आता सोशल मीडियावर खिल्ली उडविण्यात येत आहे. त्यावर प्रतिक्रियांचा पाऊस पडलेला दिसून येत आहे. चौकटएकाच वेळी काम मंजूर झाली कशीएकाच वेळी ही कामे मंजूर झाली कशी असा प्रश्न नागरिकांमधून केला जात आहे. रस्त्यांची कामे केली जात आहे. त्या ठिकाणी फलक उभारण्यात येऊन रस्त्याचे काम कधी मंजूर झालेले. ते किती दिवसात पूर्ण व्हायला पाहिजे, तसेच ठेकेदाराचा मोबाईल नंबर अशी माहिती असलेले फलक उभारण्यात यावे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. तसेच कामाचे इस्टिमेटची आकडेवारी असावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. चौकटरस्त्यांची गुणवत्ता तपासारस्त्यांची काही कामे निकृष्ट झालेली आहेत. या कामांची गुणवत्ता तपासणे गरजेचे आहे. याबाबत काहींनी प्रशासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत. त्यावर आता प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे. **(समाप्त)**

## झापुक । zupuk

कोल्ह्यासारखा किती
प्लॅन केला होता लबाड
तरीही सापडलेच
कोटींचे घबाड
हात मारून घबाड
गुपचुप होत आणलं
ते पकडुन त्यांनी
माझं दिवाळ काढल
नोटांचे स्पष्टीकरण द्यायला
पाऊल ऑफिसात टाकलं
ज्यांना लुटलं होत ते ते
अधिकारी तेथे भेटलं
एकेकाला बाजूला घेत
बंडल हाती कोंबले
पण दिलेले बंडल त्यांनी
माथी फेकून मारले
धीर देईल म्हणून गोष्टी
बायकोला सांगितल्या
ढापलेल्या नोटाच
तिने पुढ्यात टाकल्या
------------------
नवनाथ कुताळ
9422231825

## महत्वाचे...

### पंतप्रधानपदाच्या आरक्षणासाठी राष्ट्रीय गणतंत्र पक्षाचा 'महाविकास'ला बिनशर्त पाठिंबा

**मुंबई** : देशाच्या पंतप्रधानपदाच्या आरक्षणासाठी अंमलबजावणी केल्यास देशातील प्रत्येक घटकाला पंतप्रधानपदाचा लाभ मिळेल, अशी भूमिका घेत पंतप्रधानपदासाठीही आरक्षण लागू करण्याची मागणी लावून धरलेल्या राष्ट्रीय गणतंत्र पार्टीने राज्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाला आणि त्यासोबतच महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. राष्ट्रीय गणतंत्र पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रल्हाद गवारे यांनी यासाठीचा पाठिंबा जाहीर केला असल्याची माहिती मुंबईत दिली. आमच्या पक्षाकडून देशातील सर्व निवडणुका या बॅलेट पेपरवरच झाल्या पाहिजे, त्यासाठी ईव्हीएम हटावची मागणी मागील अनेक वर्षांपासून केली जात आहे. त्यासोबतच पंतप्रधानपदाच्या आरक्षणासाठी आम्ही आग्रही असून यासाठी राष्ट्रपतींकडे वेळोवेळी पत्रव्यवहार करून त्यासाठीची भूमिका विशद केली आहे.

### जया बच्चन यांना मातृशोक

मुंबई : ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेत्री जया बच्चन यांना मातृशोक झाला आहे. त्यांच्या आई इंदिरा भादुरी यांचं वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झालं. मीडिया रिपोर्ट्सनुसार, गेल्या काही दिवसांपासून त्या आजारी होत्या. डॉक्टरांच्या निरिक्षणाखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते.

# बाबा सिद्दिकींच्या हत्या प्रकरणात अनमोल बिश्नोईचा सहभाग

**मुंबई** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येपूर्वी गोळीबार करणारे गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई याचा भाऊ अनमोल बिश्नोईच्या संपर्कात होते, असा दावा मुंबई पोलिसांनी केला आहे.



अनमोलच्या संपर्कात राहण्यासाठी आरोपी मेसेजिंग प स्नॅपचॅट अकाउंटचा वापर करत होते. पण या हत्येमागील हेतू अद्याप समोर आलेला नाही. वृत्तसंस्था एएनआयने मुंबई क्राईम ब्रँचच्या हवाल्याने म्हटले आहे की, संशयित तीन शूटर्सनी बाबा सिद्दिकी यांची हत्या करण्यापूर्वी तुरुंगात बंद गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोई याच्याशी स्नॅपचॅटद्वारे संपर्क साधला होता. दसऱ्यानिमित्त फटाके फोडत असताना मुलगा जीशान सिद्दीकी याच्या कार्यालयाबाहेर बाबा सिद्दिकी यांच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या होत्या. एका फेसबुक पोस्टद्वारे, लॉरेन्स बिश्नोई टोळीच्या सदस्याने दावा केला आहे की, अभिनेता सलमान खानशी त्याचे (पान ४ वर)

# अखेर नागवडे पती-पत्नी शिवबंधनात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील सहकार क्षेत्रात मातब्बर घराणे समजले जाणारे नागवडे कुटुंबातील सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे व जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षामध्ये आज मुंबई येथे मोठ्या उत्साही वातावरणात मातोश्रीवर पक्षप्रवेश केला. यावेळी शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे व शिवसेनेचे नेते संजय राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पाडला.



दरम्यान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून उमेदवारीचा विचार न झाल्याने नागवडे कुटुंबाने आपल्या सदस्यत्वाचे राजीनामे सुपूर्द केले आणि महाविकास आघाडीकडे जाण्याचा निर्णय घेतला. गेल्या दोन-तीन दिवसापासून महाविकास आघाडीकडून नागवडे कुटुंबांना उमेदवारी मिळेल अशी जोरदार चर्चा जिल्ह्यात सुरू होती. साजन पाचपुते यांच्याही नावाची महाविकास आघाडी कडून चर्चा सुरू होती. परंतु सहकारातील एक अग्रगण्य नागवडे कुटुंब हे राजकारणाबरोबरच समाजकारणामध्ये नागवडे कुटुंबांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे साजन पाचपुते यांनी मनाचा मोठेपणा दाखवून महाविकास आघाडीकडून विशेष उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून अनुराधाताई नागवडे यांच्या उमेदवारीसाठी मनाचा मोठेपणा दाखवत विश्वास व्यक्त केला. त्यामुळे नागवडे कटुंबांनी देखील साजन पाचपुते यांना धन्यवाद दिले आहेत. सकारात्मक चर्चे नंतर नागवडे कुटुंबांचा पक्षप्रवेशाचा मुहूर्त आज २३ ऑक्टोबर रोजी ठरला गेला. पक्ष प्रवेश सोहळ्याप्रसंगी नागवडे कुटुंबांसह त्यांच्या तालुक्यातील नागवडे समर्थकांनी हातामध्ये शिवबंधन बांधले. यावेळी सुनंदाताई पाचपुते याही उपस्थित होत्या. पक्षप्रवेश सोहळा झाल्यानंतर नागवडे समर्थकांनी तालुक्यात जल्लोष करत मोठा आनंद व्यक्त केला.

दरम्यान आगामी विधानसभा निवडणुकीचे वारे वेगात वाहताना दिसत आहे त्यामध्ये श्रीगोंदा तालुक्यात एकमेकांचे पारंपारिक विरोधक पाचपुते नागवडे अशी विधानसभेच्या पार्श्वभूमीवर लढत होणार आहे. याप्रसंगी शिवसेनाप्रमुख **(पान ४ वर)**

# १०० हून अधिक विमानांना बॉम्बची धमकी

- धमक्यांमुळे सहाशे कोटींचे नुकसान
- केंद्र सरकार 'X'वर संतापले,
- अफवा पसरवणाऱ्यांवर कारवाई कधी?



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : मागील काही दिवसांपासून भारतीय विमान कंपन्यांच्या १०० पेक्षा अधिक विमानांना बॉम्बने उडवून देण्याच्या सोशल मीडियावर धमक्या मिळाल्या. त्यामुळे अनेकदा विमान प्राधिकरणाला इर्मजन्सी लँडिंग करावे लागले. तर मंगळवारी देखील इंडिगो, विस्तारा आणि एअर एअर इंडियाच्या ३० फ्लाइट्सना अशाच प्रकारच्या धमक्या मिळाल्या होत्या.

या घटनेनंतर आता केंद्रसरकार पुन्हा ॲक्टीव्ह झाले आहे. त्यांनी सोशल मिडिया प्लॅटफॉर्मच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले आहे. अशा अफवा सातत्याने पसरवल्या जात असून संबंधितांवर कठोर कारवाई केली जावी, अशा सूचना त्यांनी केल्या, आतापर्यंत तुम्ही काय कारवाई केली असा सवाल देखील त्यांनी अधिकाऱ्यांना केला.

केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालयाचे सहसचिव संकेत एस भोंडवे यांनी बुधवारी (२३ ऑक्टोबर) एअरलाइन्स कंपन्यांच्या प्रतिनिधींसोबत ज्यामध्ये द आणि चशींर सारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या अधिकाऱ्यांसोबत ऑनलाईन बैठक घेऊन अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली आहे. सोशल मिडिया हे जाहीरातीप्रमाणे काम करत आहे, अशा प्रकारच्या घटनांवर गुन्हा दाखल केला जाईल, असेही त्यांनी सांगितले. **(पान ४ वर)**

### धमक्यांमागे षडयंत्र असल्याची शक्यता?

विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू यांना या धमक्यांमागे काही षडयंत्र असू शकते का, असे माध्यमांनी विचारले असता ते म्हणाले की, सखोल तपास केल्याशिवाय असे काही म्हणता येणार नाही. या फसव्या धमक्या असल्या तरी त्या गांभीर्याने घेतल्या पाहिजेत यावर त्यांनी भर दिला. विमानतळांवर सुरक्षा वाढवण्यात आली असून चेकपॉईंटवर अधिक तपासणी केली जात आहे. आम्ही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवली आहे जेणेकरून विमानतळांवर अधिक बारकाईने लक्ष ठेवता येईल.

### १२० हून भारतीय विमान कंपन्यांना धमक्या

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांत भारतीय वाहकांच्या १२० हून अधिक विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. कालही इंडिगो, विस्तारा आणि एअर इंडियाच्या ३० फ्लाइट्सना अशा धमक्या आल्या होत्या. एअरलाइन्सने सांगितले की त्यांनी मानक ऑपरेटिंग प्रक्रियांचे पालन केले. अधिकाऱ्यांना सतर्क केले गेले आणि सुरक्षा प्रोटोकॉलचे पालन केले गेले. दरम्यान, सोमवारी परिस्थितीबद्दल माहिती देताना नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू म्हणाले होते की, प्रवाशांच्या सुरक्षेशी तडजोड न करता सरकार त्याचा सामना करण्याचा प्रयत्न करत आहे. ते पुढे म्हणाले की अशा फसव्या धमक्या प्रसारित करणाऱ्यांना नो-फ्लाय लिस्टमध्ये टाकण्यासह कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल. नागरी विमान वाहतूक कायद्याच्या विरुद्ध बेकायदेशीर कायद्याच्या दडपशाहीमध्ये सुधारणा करण्याची सरकारची योजना आहे. जेणेकरून विमान जमिनीवर असताना गुन्ह्यांसाठी कारवाई सुरू करता येईल. सध्या, विमान वाहतूक सुरक्षेचे नियम मोठ्या प्रमाणावर इन-फ्लाइट गुन्ह्यांचा समावेश करतात. या कायद्यांमध्ये आम्ही दुरूस्त्या करण्याचा प्रयत्न करत आहोत.

# संपादकीय

## थोडीशी नरमाई

२०२० मध्ये लडाखमधील गलवान खोर्‍यात चिनी सैनिकांनी सीमेवरून घुसखोरी करून भारतीय सैनिकांशी झटापट केली. त्यात भारताचे २० सैनिक हुतात्मा झाले. या झटापटीत चीनने अमान्य केले, तरी 'त्यांचे ४० सैनिक मारले गेले', अशी वृत्ते आली होती.

यामध्ये भारतीय सैनिकांनी चिनी सैनिकांना चांगलाच धडा शिकवला. त्यानंतर सातत्याने भारत आणि चीन यांच्यामध्ये गेली ४ वर्षे चर्चा अन् बैठका चालू होत्या. अशा तब्बल १८ बैठकांनंतर आता कुठे चीन थोडासा नमला आहे. वर्ष २०२३ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय ब्रिक्स परिषदेत 'दोन्ही देशांना त्यांचे संबंध सुधारायचे आहेत', असे सूतोवाच करण्यात आले होते; परंतु द्विपक्षीय चर्चा झाली नव्हती. आता परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या तहाच्या प्रयत्नांना यश येऊन 'लडाखच्या पूर्व सीमेवर वर्ष २०२० मध्ये जिथे भारतीय सैन्य गस्त घालत होते, तिथे आता ते पुन्हा गस्त घालू शकणार आहे', अशी स्थिती निर्माण झाली आहे. दोन्ही देशांमधील सीमेवरील ताण न्यून करण्याच्या दृष्टीने दोघांमध्ये काही सूत्रांची सहमती झाल्याचे वृत्त आहे. चीनसारख्या हट्टी आणि क्रूर राष्ट्राकडून या दृष्टीने एक पाऊल पडले असले, तरी कुणीही भारतीय किंवा सरकार याला हुरळून जाण्याची चूक करणार नाही, हेही तितकेच सत्य आहे आणि अनेक तज्ञांनी चीनचा वसाहतवादी स्वभाव पहाता याच प्रकारच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. 'चीन त्याचा आक्रमक रोख पालटेल, असे कुठलेही चिन्ह 'बिजिंग'च्या नीतीमध्ये दिसत नाही', असे 'तक्षशीला' संस्थेचे नितीन पै यांनी म्हटले आहे. या सर्व प्रकरणी लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे 'ज्या भागावरून चीनने भारताला त्याचे सैन्य मागे सरकवायला लावले होते, तेथे भारतीय सैन्य पुन्हा गस्त करू शकणार आहे', एवढेच चीनने मान्य केले आहे; परंतु हीच गोष्ट मोठी उपकार केल्याचा आव आणल्याप्रमाणे तो भासवू शकतो; कारण ४ वर्षे तो भारताच्याच या भागावर बळजोरीने स्वतःचा अधिकार सांगत होता. अद्यापही ५० ते ६० सहस्र चिनी सैनिक सीमेवर गस्त घालत आहेत. यावरून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते. 'अनेक वर्षे चालत आलेल्या चीन आणि भारत यांच्या सीमासंघर्षाच्या सूत्रावर या घटनेचा सकारात्मक परिणाम होऊ शकतो', असे काहींना वाटते, तर काहींच्या मतानुसार 'चीन त्याचा हेकेखोरपणा सोडणे कठीण आहे', असे त्यांना वाटते. आतापर्यंत झालेले कितीतरी करार पाकिस्तानप्रमाणेच चीननेही तोडले आहेत. या दोन्ही देशांच्या लेखी अशा करारांना काही फारसे महत्त्व नसतेच. मनाला वाटले, जरा जरी संधी मिळाली की, दुसर्‍याच्या भूमी बळकवायच्या, नाहीतर दुसर्‍यावर आक्रमण करायचे, हेच अनुक्रमे चीन आणि पाक यांचे अलिखित धोरण असते.

सध्याच्या तहातील सर्वांत मुख्य सूत्र आहे की, वर्ष २०२० मध्ये होते, त्याप्रमाणे चिनी सैनिक त्यांच्या पूर्वीच्या स्थानी जातील आणि तेथील 'वाय' या जंक्शनवर भारतीय सैनिकांना गस्त घालायला विरोध करणार नाहीत. सीमेवर महिन्यातून २ वेळा दोन्हीकडच्या सैनिकांची गस्त होईल आणि ती एकमेकांना पूर्वसूचना देऊन होईल; जेणेकरून विश्वासार्हता राहील, तसेच गस्तीच्या वेळी १५ एवढी अल्प सैनिकांची संख्या असेल. महिन्यातून एकदा सैन्याधिकारी स्तरावर चर्चा होईल. पेंगाँग त्सो तलावाच्या उत्तर भागात, गलवान, हॉट स्प्रिंग्स आणि गोगरा या काही सीमांवर चीन अन् भारत या दोन्ही देशांचे सैनिक गस्त घालतील. २२ आणि २३ ऑक्टोबरला रशियात होणार्‍या ब्रिक्स परिषदेत दोन्ही देशांच्या पंतप्रधानांमध्ये चर्चा होण्याची शक्यता आहे. चीनसमवेत झालेल्या या तहाच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वाची ठरेल. सैन्याच्या गस्तीविषयीची वरील सूत्रे काही प्रमाणात ठरली असली, तरी चीनच्या तह न पाळण्याच्या स्वभावानुसार भारत त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवू शकणार नाही, हे ओघाने आलेच !

चीन त्याची काहीतरी 'अडचण' झाल्यामुळे काहीसा नमला आहे, यात शंका नाही. चीन आणि पश्चिमी देश यांच्यातील संबंध तितकेसे चांगले राहिलेले नाहीत. 'त्याचाही एक परिणाम म्हणून चीनने हे पाऊल उचलले असावे', असाही एक कयास आहे. चीनने युक्रेनच्या विरोधात रशियाला चालू ठेवलेले साहाय्य बर्‍याच देशांना तितकेसे रुचलेले नाही. अमेरिकेशी त्याचे संबंध सुधारण्याची कुठलीही चिन्हे नाहीत आणि अमेरिकेत कुठलाही राष्ट्रपती आला, तरी संबंधांत काही फरक पडणार नाही. चीनमधील एक प्रकारच्या हुकूमशाहीप्रमाणे असलेल्या राजवटीला देशांतर्गत नव्या पिढीचा वाढत असलेला विरोध आणि दुसर्‍या बाजूला ढासळत चाललेली अर्थव्यवस्था, या सार्‍या गोष्टींच्या पार्श्वभूमीवर चीनला भारतासारख्या तुल्यबळ अन् व्यापार असणार्‍या शेजार्‍याशी थेट वाकड्यात जाणे परवडणारे नाही, असा धूर्त विचार चीनने केला असावा.

चीनच्या विजेवर चालणार्‍या वाहनांविषयी पश्चिमी देशात तितकी चांगली मागणी नाही. तिथे चीनच्या वाहनांना नावे ठेवली जातात. चीनला त्यासाठी भारताची बाजारपेठ हवी आहे. चीन अनेक गोष्टी भारताच्या बाजारपेठेत घुसवत असतो. आता भारतात दिवाळीही आहे. याचीही पार्श्वभूमी त्याला आहे. भारतातून चीनच्या अनेक गोष्टी आजही आयात केल्या जातात. गेल्या काही वर्षांत भारतातील चीनविरोधी मोहिमांमुळे चीनच्या व्यापारावर परिणामही झाला आहे. अशा अनेक गोष्टींचा विचार करून एक पाऊल मागे घेऊन नमते घेतल्यासारखे दाखवणे, हे सध्याच्या घडीला चीनला योग्य वाटले असावे. सध्या अनेक बाजूंनी चीनची कोंडी होत असल्यामुळे चीनने वरील निर्णय घेतला असण्याची अधिक शक्यता आहे. यावरून राष्ट्राभिमान जागृत ठेवून आर्थिक कोंडी करण्याचे महत्त्व भारतियांनी लक्षात घेऊन चीनला धडा शिकवला पाहिजे. सर्व भारतियांनी ठरवून अजूनही चिनी वस्तूंवर पूर्ण आर्थिक बहिष्कार घालायचे ठरवले, तर चीन कदाचित् अजूनही नमते घेऊ शकतो, हा धडा भारतियांनी घेतला पाहिजे आणि एक राष्ट्राभिमानी नागरिक म्हणून प्रत्येक चिनी वस्तूंवर बहिष्कार घातला पाहिजे. आपल्या सैनिकांच्या प्राणापेक्षा आपल्याला कुठलीही विशेष सुविधा, चैन किंवा मौजमजा ही महत्त्वाची असू शकत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. चीन नमते घेईल किंवा तसे नाटक करेल; पण भारतियांनी राष्ट्राप्रतीचे त्यांचे प्रेम चिनी वस्तूंच्या आर्थिक बहिष्काराच्या कृतीतून मात्र सतत दाखवत राहिले पाहिजे !

# वारकरी साधनेने मोठा मानला जातो : रामानंदगिरी महाराज

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**माळवाडगांव :** परमार्थ घडण्याकरिता पैसा लागत नसुन पुण्य अन् सत्कर्म लागते.भगवंताचे नामस्मरण करणारा माणुस फाटक्या कपड्यावाला असला तरी तो सामान्य नाही .वारकरी साधनाने मोठा होत नसुन तो साधनेने मोठा होतो.असे प्रतिपादन महंत रामानंदगिरी महाराज मुक्ताई ज्ञानपीठ पुणतांबा यांनी माळवाडगांव येथील किर्तन महोत्सव सोहळ्यात भाविकांना उपदेश करताना केले.

श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव येथे कै.भामाबाई वामनराव आसने यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्ताने सुरू असलेल्या पंचदिवशीय किर्तन महोत्सव सोहळ्यात रामानंदगिरी महाराज यांनी चौथे पुष्प किर्तनातून गुंफले.

धन्य ते संसारी , धन्य ते संसारी या संत तुकाराम महाराज यांच्या अभंगवाणीतून भाविकांना उपदेश करताना महाराज पुढे म्हणाले की जगात पैशाला कमी नाही. श्रीमंताकडे असतोच परंतू सर्वसामान्या कडेही भरपूर पैसा आहे.संत तुकाराम महाराजांनी परमार्थात पैशाला अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. ज्यांच्या जीवनात सर्व परमार्थ चिंतनाची सर्व तत्व आहे त्या संसारी भक्तांना महाराज या अभंगातून धन्यवाद देतात . गणपतराव आसने परिवाराने हा मातोश्री भामाबाई यांचा पाच दिवस पुण्यस्मरण सोहळा केला. हा सोहळा म्हणजे त्यांना मातेने दिलेल्या संस्काराची शिदोरी आहे .वारकरी संप्रदायाचे

आज गुरूवार दि.२४ रोजी सकाळी १० वाजता निवृती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या किर्तनाने पंचदिवशीय किर्तन महोत्सव सोहळ्याची सांगता होणार आहे.

सदैव सहवासात असणाऱ्या या परिवाराला धन्यवाद दिले. महाराज शेवटी म्हणाले की साधूच्या मनात आले तर रेड्यामुखी वेद बोलवितात. भिंत घालवितात. तर माझ्यासारख्या भक्ताला गुरूवर्य सद्गुरू नारायणगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने खुप मोठ्या आजाराचे संकटातून वाचविले. किर्तन करण्यासाठी माझी तब्येत अद्याप पाहिजे तशी तंदुरुस्त नाही. आग्रहाखातर मी ऋणानुबंध संबंधांमुळे मी या किर्तनाचा स्विकार केला. ऊर्वरित आयुष्याची सेवा गुरूच्याच चरणी समर्पित करत राहणार आहे. या किर्तन प्रसंगी उत्तम महाराज गाढे, अमोल महाराज गाढे, रावसाहेब महाराज वेताळ,विकास महाराज बनसोडे, पखवाज वादक परमेश्वर महाराज यांच्यासह माळवाडगांव व पंचक्रोशीतील भजनी मंडळांनी भजन गायनात साथ दिली.

# पोहेगाव सोसायटीचे ११ टक्के लाभांश वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** तालुक्यातील सहकार चळवळीतील अग्रगण्य समाजाला जाणाऱ्या पोहेगाव नंबर १ विकास सोसायटीने सभासदांना दिवाळीपूर्वी ११ टक्के लाभांश वाटप केले. जवळपास ४५९ सभासदांना हा लाभांश मिळणार असल्याचे संस्थेचे अध्यक्ष संजय शिंदे यांनी सांगितले. काल (बुधवार) पासून लाभांश वाटपाला सुरुवात झाली असून प्रतिनिधिक स्वरूपात संस्थेच्या ज्येष्ठ संचालक मंडळींकडून लाभांश वाटप करण्यात आले. अध्यक्ष संजय शिंदे, उपाध्यक्ष कचेश्वर रांधव, सुनील शिंदे, अतुल औताडे, विलास औताडे, कैलास जाधव, बाबासाहेब औताडे, चांगदेव शिंदे, विलास जाधव, ज्ञानदेव शिंदे, संदीप औताडे, रावसाहेब भुजबळ, सचिव बाळासाहेब खांडगे, दादा गवारे, निलेश जाधव उपस्थित होते. शिंदे यांनी संस्थेबद्दल माहिती देताना सांगितले की, संस्था सध्या प्रगतीच्या वाटेवर असून संस्थेने चालू आर्थिक वर्षामध्ये कै माधवराव बारकुजी शिंदे व्यापारी संकुल उभारून सभासदांच्या मुलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. अजूनही संस्थेच्या जुन्या इमारती संदर्भात निर्णय घेऊन तेथे देखील मोठ्या प्रमाणात व्यापारी संकुलनाची उभारणी होणार असून सभासदांच्या मुलांना या माध्यमातून रोजगार मिळणार आहे.



# सरपंच सेवा संघाच्या जिल्हाध्यक्षपदी पठाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**गंगापूर :** सरपंच सेवा संघाच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या महिला जिल्हाध्यक्षपदी वाळूज ग्रामपंचायतीच्या सरपंच सईदा पठाण यांची नियुक्ती करण्यात आली, असून त्यांच्या नियुक्तीबद्दल जामगाव ग्रामपंचायत सरपंच बशीर पटेल व ग्रामविकास अधिकारी यु.सी.भोंडवे आदींनी त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी जामगांव ग्रामपंचायत सरपंच बशीर पटेल व ग्रामविकास अधिकारी यु.सी.भोंडवे आदी उपस्थित होते.

# ४६ वर्षात एकाही पक्षाने लढविल्या नाहीत २८८ जागा!

राज्यात १४५ नोंदणीकृत पक्ष आणि ६ राष्ट्रीय आणि ४ राज्यस्तरीय पक्ष असतानाही गेल्या २४ वर्षात कुठल्याही पक्षाने २८८ जागा लढविलेल्या नाहीत. सर्वात सक्षम असलेल्या काँग्रेसने १९७८ पासून कधीच २८८ जागांवर उमेदवार उभे केलेले नाहीत. तोच किस्सा अन्य पक्षांनीही गिरविल्याचे दिसून येते.

या निवडणुकीत काँग्रेस, भाजप, आप, सीपीआय (एम), बीएसपी नॅशनल पीपल पार्टी (एनपीपी) या राष्ट्रीय पक्षाचा आणि मनसे, अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना या पाच राज्यस्तरीय पक्षांचा समावेश आहे. दुसरीकडे देशभरात २ हजार ७६३ नोंदणीकृत पक्ष असून ६ राष्ट्रीय पक्ष आणि ५८ राज्यस्तरीय पक्षांची नोंद निवडणूक आयोगाकडे आहे.

राज्यातील २८८ विधानसभा मतदार संघात ९ कोटी ६३ लाख मतदार हे आपल्या मतदानाचा हक्क बजावणार आहेत. त्यामध्ये ४ कोटी ९७ लाख पुरुष आणि ४ कोटी ६६ लाख स्त्री मतदार आहेत. १ लाख १८६ मतदान केंद्र असून त्यामध्ये सर्वाधिक ५७ हजार ५८२ मतदान केंद्र हे ग्रामीण भागात आहेत. ४२ हजार ६०४ मतदार हे शहरी भागातील आहेत. तब्बल १ कोटी ५५ लाख तरुण मतदार २० ते २९ वयोगटातील असून २० लाख ९३ हजार मतदार हे पहिल्यांदा मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मात्र राज्यातील एकही राजकीय पक्ष असा नाही जो सर्वच्या सर्व २८८ विधानसभेच्या जागा लढवित आहे. सत्तेसाठी बनलेल्या आघाड्या व युती तसेच पराभूत होण्याच्या भीतीने एकाही राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय पक्षाने २८८ जागांवर निवडणूक लढविण्याचे धारिष्ट्य दाखविलेले नाही. काँग्रेसने १९८५ मध्ये विधानसभा निवडणुकीत २८८ पैकी २८७ जागा लढविल्या होत्या. १९९० मध्ये २७६ जागा लढविल्या.

आणीबाणीनंतर १९७८ मध्ये विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने २५९ जागा तर जनता पार्टीने २१५ जागांवर उमेदवार उभे केले होते. राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर १९९९ मध्ये सर्वाधिक २२३ जागांवर उमेदवार उभे केले होते. भाजप आणि शिवसेनेने देखील कधीच दोनशेचा आकडा पार केलेला नाही. स्वबळाचा नारा देणा-या मनसेने २०१४ मध्ये सर्वाधिक २१९ जागांवर उमेदवार उभे केले होते. एकंदरीत आघाड्या आणि युतीमुळे गेल्या ४६ वर्षांपासून एकाही पक्षाने २८८ जागा लढविलेल्या नाहीत.

# सुसंस्काराच्या पेरणीतुन सरोदे परिवाराला उत्कर्षाकडे नेणारी वात्सल्यमूर्ती-श्रीमती परिगाबाई सरोदे

कठीण परिस्थितीत ही मुलांवर सुसंस्काराची पेरणी करत पतीच्या बरोबर राहून पडेल ते काम करून त्यांना खंबीरपणे साथ देत सरोदे परिवाराच्या संसाराला उत्कर्षाकडे नेणाऱ्या वात्सल्यमूर्ती श्रीमती परिगाबाई सुखदेव सरोदे हया माऊली खऱ्या अर्थाने वात्सल्यमूर्ती ठरल्या आहेत. त्यांच्या दशक्रिया विधीच्या निमित्ताने त्यांच्या खडतर पण यशस्वी कार्याचा हा शब्द प्रपंच....

नेवासा तालुक्यातील पिचडगाव येथील शेतमजूर कै. सुखदेव सरोदे यांच्या पत्नी श्रीमती परिगाबाई सरोदे यांचे गंगापूर तालुक्यातील बगडी हे माहेर.कोणतेही शिक्षण नसलेल्या परिगाबाईचा विवाह बालवयातच झाला.सरोदे परिवारात त्यांनी, दिर भाया नणंदा यांची मनोभावे सेवा दिली.एकत्रित कुटुंब पध्दतीची परंपरा त्यांनी कायम ठेवली.परिगाबाईंना चार मुले एक मुलगी यामध्ये मोठा मुलगा विठ्ठल पदवीधर झाल्यानंतर त्यास हॉटेल व्यवसायासह



शेतात गुंतवले.

दुसरा मुलगा दिलीप यास लहानपणा पासूनच समाज कार्याची आवड असल्याने इयत्ता बारावी शिक्षण झाल्याने नेवासा तहसील कार्यालयासमोर बसून दस्तलेखक म्हणून काम करतांना त्यांनी तालुक्यातील संपूर्ण गोरगरीब समाजाची सेवा करून शासकीय योजनांचा लाभ मिळवून दिला,त्यांच्या कामाची दखल घेत माजी आमदार नरेंद्र घुले व शेखरभाऊ घुले,माजी आमदार तुकाराम गडाख यांच्या शिफारशीतून भेंडा गटातून जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले या यशाच्या मागे देखील आई परिगाबाईं चीच प्रेरणा होती

तिसरा मुलगा पोपट याची सरकारी पाटबंधारे विभागात वर्णी लागली तर चौथा मुलगा अर्जुन हा सहकारी बँकेत कर्मचारी म्हणून सेवेत आहे.मुलगी भीमाबाई वाहूरवाघ ही देखील तामसवाडी येथे अंगणवाडी सेविका आहे या सर्व यशामागेही आई परिगाबाई यांचीच प्रेरणा होती. चार ही मुले विविध क्षेत्रात यशस्वी झाल्यानंतर एकत्रित कुटुंब पद्धतीमुळे त्यांची मुले ही एक विचारी राहिली आपल्या डोळ्या देखत त्यांनी सरोदे परिवाराची होणारी उत्कर्षाकडे वाटचाल ही पाहिली हे यश परिगाबाईंनी केलेले कष्ट व दिलेले संस्कार यामुळे त्यांना आपल्या वयाच्या ८७ व्या वर्षी डोळ्यांनी पहाता आले. सेवाभाव वृत्ती परिघाबाई यांच्या नसानसात भरलेली होती.म्हणून दारावर आलेल्या तहानलेल्या जीवाला पाणी,भुकेल्याला अन्न, नागड्याला वस्त्र हे कार्य त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत केले.

संकटात सापडल्यांना आधार देण्याचे काम परिगाबाईंनी केले. आपल्या चार मुले व एक मुलगी या पाच भावंडयांचे दहा नातू,पाच नाती,सर्व सूना त्यांना आपल्या डोळ्यांनी पहाता आल्या.विशेष म्हणजे आपल्या सुनांसह नात सुनांचे ही बाळंतपण माहेरी न करता त्यांनी सासरीच केले. त्यांच्या आरोग्याची काळजी ही घेतली त्यामुळे परिगाबाई हया विस्तारलेल्या वटवृक्षाच्या आधारवड ठरल्या,आज अनेक कुटुंब आपल्याला विखुरलेली दिसतात मात्र सरोदे कुटुंबातील सर्व सदस्यांना एकत्र ठेवण्याची किमया परिगाबाई यांनी आपल्या संस्काराच्या जोरावर करून दाखवली....जगासाठी आदर्शवत असलेल्या त्यांच्या या कार्याला कोटी कोटी वंदन...शेवटी म्हणावेसे वाटते.. बाई ...तू सोडून गेली आठवणीच्या जखमा, आम्ही हरपून गेलो..बाई तुला विसरायचे आम्ही..विसरूनच गेलो परिगाबाई सरोदे यांना दशक्रिया विधी निमित्ताने भावपूर्ण श्रद्धांजली... स्मृतीस अभिवादन

**शब्दांकन--सुधीर चव्हाण**
**पत्रकार नेवासा**
**संकलन-दिलीपराव सरोदे-**
**माजी जिल्हा परिषद सदस्य**

# निधन वार्ता



## धनश्री तोरकड

**गणोरे :** अकोले तालुक्यातील वीरगाव येथील सौ.धनश्री भाऊसाहेब तोरकड (वय४५वर्षे) यांचे हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले. सिन्नर तालुक्यातील ठाणगाव येथील पुंजाजी रामजी भोर विद्यालयाचे मुख्याध्यापक भाऊसाहेब तोरकड यांच्या त्या पत्नी होत.



## लक्ष्मण हारदे

**राहुरी :** तालुक्यातील वडनेर येथील प्रगतशील शेतकरी लक्ष्मण भीमराज हारदे(वय-६४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. माजी सरपंच ज्ञानदेव व विश्वनाथ हारदे यांचे ते बंधू होत.



## सिंधुताई बुऱ्हाडे

**राहुरी :** येथिल गं.भा. सिंधुताई रघुनाथ बु-हाडे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ७८ वर्षांच्या होत्या. त्या अरुण बऱ्हाडे यांच्या मातोश्री होत.



## सुमनबाई खर्डे

**कोल्हार :** कोल्हार बुद्रुक येथील रान शेंडा वस्तीवरील सुमनबाई रामभाऊ खर्डे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. प्रवरानगर येथील माननीय आमदार राधाकृष्ण विखे पाटील ट्रक संस्थेचे मॅनेजर जालिंदर खर्डे नवनाथ खर्डे व गोरख खर्डे यांच्या त्या मातोश्री होत.



## शांताबाई पंडित

**कोल्हार :** सात्रळ येथील शांताबाई पंडित वय ८३ यांचे नुकतेच वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कोल्हार येथील राजेश्री ट्रेडर्सचे संचालक विपुल अगस्तीन पंडित यांच्या त्या आजी होत.



## बाळासाहेब म्हस्के

**लोणी :** राहाता तालुक्यातील लोणी बुद्रुक येथील मुळा-प्रवरा वीज संस्थेचे सेवानिवृत्त कर्मचारी बाळासाहेब नामदेव म्हस्के (वय ६०) यांचे नुकतेच निधन झाले.पत्रकार दादासाहेब म्हस्के यांचे ते बंधू होत.

# जागतिक पोलिओ दिन

**आजचा दिवस (२४ ऑक्टोबरः जगात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पोलिओ मुक्तीसाठी मोलाचे योगदान देणारे शास्त्रज्ञ जॉन सॉल्क यांचा आज जन्मदिवस. जॉन सॉल्क आणि त्यांच्या टीमने पोलिओची पहिली लस शोधून काढली म्हणून त्यांचाच जन्मदिन जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय जागतिक आरोग्य संघटनेने घेतला.**

आजच्या दिवसाकडे पोलिओशी दिलेल्या यशस्वी लढ्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने १९९८ सालापासून पल्स पोलिओची मोहीम हाती घेतली. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यातील रविवार पोलिओ रविवार म्हणून साजरा केला जातो. पोलिओ रविवारच्या नंतरच्या आठवड्यात ० ते ५ वयोगतील बालकांना घरोघरी जाऊन पोलिओचा डोस पाजला जातो. त्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती केली जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आपल्या आरोग्य यंत्रणेने भारतातून पोलिओ मुक्तीसाठी अथक प्रयत्न केले. अमिताभ बच्चन, मोहम्मद कैफ इत्यादी व्यक्तींनीही दूरचित्रवाणीवरून जनजागृती केली. शासन, प्रशासन, आरोग्य यंत्रणा यांच्या अथक प्रयत्नातून आज भारत पोलिओ मुक्त झाला आहे.

२७ मार्च २०११ या दिवशी जागतिक आरोग्य संघटनेने भारत पोलिओ मुक्त झाल्याची घोषणा केली. अर्थात सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाला पोलिओ मुक्त करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती. सुरवातीला तर पालक आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्यास तयारच होत नसे. आपल्या बालकांना पोलिओ डोस पाजण्यास पालक निरुत्साही होते. लोक घरातून बाहेरच पडत नसत. पालकांचा निरुत्साह असला तरी आरोग्य खात्यातील कर्मचारी हिरमुसले नाही. त्यांनी त्यांचे काम चालूच ठेवले. एखादे व्रत हाती घेतल्या प्रमाणे देशातील आरोग्य कर्मचारी पोलिओ मुक्तीसाठी झटत होते. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना लवकरच यश मिळाले. १९९९ साली पोलिओच्या तीन विषाणूंपैकी दुसरा विषाणू नष्ट झाला मात्र पहिल्या आणि तिसऱ्या प्रकारचा विषाणू अजूनही कार्यरत होता. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यात दूषित पाण्यामुळे जुलाब,उलट्यांचे प्रमाण अधिक असल्याने तिथे तोंडावाटे दिलेली लस उपयुक्त ठरत नव्हती. तेंव्हा वैद्यकीय संशोधकांनी मुरदाबाद या गावात पोलिओची एक गुणी लस म्हणजे १,२,३ विषाणूंची लस वेगवेगळी प्रत्येक जन्मलेल्या बाळास दिली. मात्र देशातील सगळ्या बालकांपर्यंत असा कार्यक्रम पोहचवणे अशक्य होते. त्यानंतर पुन्हा त्यात संशोधन करण्यात आले.

सर्वांना उपयुक्त अशा लसीची मात्रा तयार झाल्यानंतर देशात पोलिओ मुक्तीची मोहीम वेगाने राबवण्यात आली. त्याचा परिणाम म्हणजे आज पोलिओमुक्त मुक्त भारत अशी आपली ओळख बनली आहे. भारत जरी पोलिओमुक्त झाला असला तरी जगातून पोलिओचे अजूनही समूळ उच्चाटन झाले नाही. आफ्रिका खंडातील काही देशात तसेच आशिया खंडातील पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया या देशात अजूनही पोलिओचे रुग्ण आढळून येतात.

**– श्याम ठाणेदार**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

# लाडक्या बहिणी व लाडके भाऊ सरकारला धडा शिकवतील : आ.तनपुरे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील लाडक्या भावांना तीन महिन्यांपासून वेतन नाही. लाडकी बहीण योजना बंद केली. तिजोरीत खडखडाट असताना लाडके भाऊ-बहिणींना गाजर दाखविण्याचे काम राज्य सरकार करीत आहे. महागाई वाढवून दिलेले परत घ्यायचे काम सुरू आहे. लाडके भाऊ-बहीण सरकारला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत, असे आमदार प्राजक्त तनपुरे यांनी सांगितले.



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील कर्मचाऱ्यांनी काल (मंगळवारी) आमदार तनपुरे यांच्यासमोर व्यथा मांडली. यावेळी योजनेतील कर्मचाऱ्यांसह तहसीलदार नामदेव पाटील यांना निवेदन दिल्यावर आमदार तनपुरे बोलत होते. ते म्हणाले की, राहुरी तालुक्यात १५० तरुण मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत अत्यंत तुटपुंज्या वेतनावर काम करीत आहेत. ते कंत्राटी पद्धतीने जुलै व ऑगस्ट महिन्यात कामावर रुजू झाले. तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय, पंचायत समिती, तहसील कार्यालय येथे काम करीत आहेत. त्यांची हजेरी पाठविली. परंतु तीन महिन्यांपासून त्यांना वेतन दिलेले नाही. निवडणूक डोळ्यासमोर ठेवून घाईत केलेल्या योजनांचा तरुणांना मनस्ताप होत आहे. तरुणांना गाजर दाखवून त्यांचा राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न महायुती सरकारने चालविला आहे.

श्रावणबाळ, संजय गांधी निराधार अशा योजना आचारसंहितेत चालू आहेत. परंतु निवडणुकीच्या तोंडावर आणलेली लाडकी बहीण योजना आचारसंहितेचे कारण पुढे करून बंद केली. वास्तविक निवडणूक आयोगासमोर बाजू मांडायला राज्य सरकार तरबेज आहे. धनुष्यबाण चिन्ह एकनाथ शिंदे यांना मिळतं. घड्याळ चिन्ह अजित पवार यांना मिळतं.प्रत्येक निर्णय राज्य सरकारच्या बाजूने लागतो. मात्र लाडकी बहीण योजना चालू करायला सरकार कमी पडत असेल तर शंका येते. तिजोरीत खडखडाट असताना लाडके भाऊ व लाडक्या बहिणींना गाजर दाखविण्याचे काम सरकार करीत आहे. दिवाळीच्या तोंडावर किराणा सामानाच्या महागाईचा भडका उडविला आहे. एका हाताने द्यायचे, दुसऱ्या हाताने घ्यायचे चालू आहे. लाडके बहीण-भाऊ हुशार आहेत. ते सरकारला धडा शिकवतील, असेही तनपुरे यांनी सांगितले.

> मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत कार्यरत आहे. रुजू रिपोर्ट, हजेरी रिपोर्ट गेले. तीन महिन्यांपासून वेतन मिळाले नाही. आमदार प्राजक्त तनपुरे यांच्यासमोर व्यथा मांडली. तहसीलदारांना निवेदन दिले. त्यांनी चार-पाच दिवसात वेतन मिळेल, असे आश्वासन दिले आहे.
>
> **-समीर सिनारे, कंत्राटी कर्मचारी, राहुरी पंचायत समिती**

# संगमनेरकर दादागिरी खपवून घेणार नाहीत : जयश्री थोरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : आमदार बाळासाहेब थोरात यांच्या अविश्रांत कामातून संगमनेर तालुका उभा राहिला आहे. येथील सहकार, शिक्षण, समाजकारण हे आदर्शवत आहे. मात्र हे बिघडवण्यासाठी आणि तरुणांची डोके भडकवण्यासाठी काही लोक बाहेरून येऊन भाषण करत आहेत. दादागिरी आणि दडपशाही काय असते की त्यांच्या भाषणातून कळत आहे. हा संगमनेर तालुका असून दादागिरी करत नाही आणि कुणाची दादागिरी सह सुद्धा करत नाही असे सांगताना नगर-मनमाड रस्ता ही त्यांची निष्क्रियतेची मोठी ओळख असल्याची टीका युवा काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. जयश्रीताई थोरात विखे पिता-पुत्रांवर केली.

**युवा संवाद यात्रेला चांगला प्रतिसाद**



चिखली, धांदरफळ, वडगाव लांडगा, जवळेकडलग, राजापूर येथे झालेल्या युवा संवाद यात्रेत त्या बोलत होत्या. यावेळी मिलिंद कानवडे, रामहरी कातोरे, चंद्रकांत कडलग, विष्णुपंत रहाटळ, विनोद हासे, श्रीराम पवार, दत्तू कोकणे, आनंद वर्पे बाळासाहेब कानवडे, प्रदीप हासे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.डॉ. थोरात म्हणाल्या की, संगमनेर तालुका हा स्वातंत्र्यसैनिकांचा वारसा असलेला तालुका आहे. मोठ्या कष्टातून हा तालुका उभा राहिला आहे. सुसंस्कृत राजकारण हे संगमनेर तालुक्याचे वैशिष्ट्य आहे. तरुणांची चांगली पिढी घडवण्यासाठी काम केले जात आहे .मात्र बाहेरून येणारे लोक येथे माथी भडकवत आहेत. दादागिरी आणि दडपशाही काय असते त्यांच्या भाषणातून कळत आहे. नगर दक्षिणेमधून त्यांना पराभूत व्हावे लागले ते निष्क्रियतेमुळेच. गचक्यांचा रस्ता म्हणून प्रसिद्ध असलेला नगर-मनमाड रस्ता हे निष्क्रियतेचे मोठे उदाहरण आहे. राहाता तालुक्यातील सर्व सहकारी संस्था अडचणीत आहे. ज्यांनी अनेक संस्था बंद पाडल्या ते आता विकासाच्या गप्पा करत असल्याचा उपरोधिक टोला त्यांनी लगावला. आपल्याला सुसंस्कृत राजकारणाची परंपरा जपत पुढे जायचे आहे. जातीभेद करून दादागिरी निर्माण करू पाहणाऱ्यांना सर्वांनी वेळीच रोखायचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केलेयरामहरी कातोरे म्हणाले की, आमदार बाळासाहेब थोरात यांच्यावर राज्याची जबाबदारी आहे. संगमनेर तालुका हा कायम काँग्रेसच्या विचाराचा राहिला आणि भक्कमपणे एकवटला आहे. ज्यावेळेस तालुक्याची अस्मिता डिचवली जाते. त्यावेळेस तालुका एकवटून लढा देतो हे आपले वैशिष्ट्य आहे. तालुक्याच्या स्वाभिमानासाठी आणि अस्मितेसाठी आता सर्वांनी एकजुटीने लढण्याचे आाहन त्यांनी केले.

# अस्तित्वासाठी आ. कानडे काँग्रेसला विसरले : हेमंत ओगले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : आयत्या वेळेला काँग्रेस पक्षात येऊन विधानसभेची उमेदवारी मिळवून अनेक वर्ष काँग्रेस पक्षासाठी झटणाऱ्या आणि काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना व सहकाऱ्यांना वाऱ्यावर सोडून स्वतःचा गट स्थापन करण्याच्या नादात काँग्रेस पक्ष संघटना कमकुवत करण्याचा प्रयत्न आमदार लहू कानडे यांनी केला, असा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कामिटीचे सरचिटणीस हेमंत ओगले यांनी प्रसिद्धीपत्रक काढून केला आहे. पत्रकात ओगले यांनी म्हटले आहे की, आ. बाळासाहेब थोरात यांच्या आदेशानुसार जयंतराव ससाणे यांचे मित्र व सहकारी व काँग्रेस पक्षाचे अनेक वर्षाचे निष्ठवान कार्यकर्त्यांनी कानडे अथक परिश्रम घेऊन त्यांना निवडून आणले. परंतु एका महिन्याच्या आत कानडे यांनी मूळ काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना अपमानित करणे, उर्मट बोलणे, काँग्रेस कार्यकर्त्यांचे काम न ऐकणे अशा पद्धतीने काम सुरू केल्याने मूळ काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांचा भ्रमनिरास झाला. खुषमस्कऱ्या व चमचेगिरी करणाऱ्या लोकांना ते बळी पडले. प्रस्थापित नेते असे वागणार नाहीत असे गेले पाच वर्ष कानडे वागले. कानडे यांच्या आमदारकीच्या काळात नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका झाल्या नाही. त्या जर झाल्या असत्या तर काँग्रेस संघटनेचे महत्त्व लहू कानडे यांना समजले असते. गेल्या अनेक वर्ष सातत्याने सर्वसामान्यांची कामे व मतदारसंघाचा विकास करून स्वर्गीय जयंतराव ससाणेनी काँग्रेस पक्षाचे भक्कम संघटन उभे केले. परंतु स्वतःचा गट स्थापन करण्याच्या नादात कानडे यांनी मूळ काँग्रेस पक्षाच्या संघटनेतील कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केले व त्यांच्यावरती अन्याय केला.

# राहुरी येथे आज युवा संकल्प मेळावा : राजू शेटे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : आगामी विधान सभेच्या निवडणुकीचया पार्श्वभूमीवर राहुरी-नगर-पाथर्डी मतदारसंघातील धर्मवीर संभाजीराजे युवा प्रतिष्ठानच्यावतीने उद्या (गुरुवार) सकाळी अकरा वाजता राहुरी तालुक्यातील युवा संकल्प मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती धर्मवीर संभाजीराजे युवा प्रतिष्ठानचे संस्थापक राजेंद्र शेटे यांनी दिली आहे. येणारी विधानसभा निवडणूक तसेच युवकांच्या इतर समस्यांच्या बाबतीत मेळाव्यात विचारविनिमय होणार असून यावेळी शेतकऱ्यांसह मतदार संघातील नागरिकांच्या समस्यांसंदर्भात चर्चा करण्यात येणार आहे

राहुरी शहरातील नगर- मनमाड महामार्गावरील विठ्ठला लॉन्स येथे हा मेळावा होणार असून जास्तीत जास्त युवा कार्यकर्त्यांनी या मेळाव्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठानचे संदीप आढाव, राहुल तमनर, गणेश खुळे, रामा शिंदे, नितीन कदम आदींनी केले आहे.

# शास्त्रीय पद्धतीने शेती केल्यास उत्पादकतेत वाढ : कदम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : तंत्रज्ञानामध्ये सातत्याने होणारे बदल विचारात घेऊन शेतकरीवर्गाने शास्त्रीय पद्धतीने शेती केल्यास शेतीमध्ये उत्पादकता वाढण्यास मदत होते, असे प्रतिपादन मंडल कृषी अधिकारी मधुकर कदम यांनी केले.



पुणतांबा येथे पुण्यस्तंभ शेतकरी उत्पादक कंपनीच्यावतीने आयोजित केलेल्या शेतकरी मेळाव्यात ते मार्गदर्शन करत होते. यावेळी पुण्यस्तंभ शेतकरी उत्पादक कंपनीच्या अध्यक्षा सुनीता धनवटे, कृषी सहाय्यक किरण धुमाळ, प्रशांत धनवटे, ज्ञानेश्वर धनवटे, प्राचार्य डॉ. एस. आर. बखळे, दीपक धनवटे, देवेंद्र बारहाते, सोपान धनवटे, युवराज धनवटे, रोहित धनवटे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. कदम म्हणाले की, शेतकऱ्यांनी आधुनिक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून व्यावसायिक पद्धतीने शेती केली पाहिजे.

रब्बी हंगामात गहू, हरभरा, ज्वारी, कांदा यासह अनेक पिकांची पेरणी करण्यापूर्वी जमिनीचा पोत, बियाणांची योग्य निवड याचा विचार करण्याची गरज आहे. त्यांनी हरभरा पिकातील बीजप्रक्रिया, खत व्यवस्थापन, तण व्यवस्थापन, एकात्मिक किड व रोग नियत्रंण याबाबत उपयुक्त माहिती दिली. सातत्याने होणाऱ्या हवामान बदलाबाबत सतर्क राहून योग्य नियोजन केले पाहिजे याचा त्यांनी आर्वजून उल्लेख केला. कृषी सहाय्यक किरण धुमाळ यांनी ज्वारी बीजप्रकिया प्रात्यक्षिक करून दाखविले तसेच कांदा रोपवाटिका व्यवस्थापनाबाबद मार्गदर्शन केले. ज्ञानेश्वर धनवटे यांनी आभार मानले

# दीपावलीसाठी संगमनेर दूध संघाचे ३७ कोटी बँकेत वर्ग : देशमुख

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघास प्राथमिक दूध उत्पादक संस्थांनी गेल्या वर्षात पुरविलेल्या चांगल्या गुणप्रतीच्या दुधावर संघामार्फत दूध उत्पादकांना दीपावलीनिमित्त दूध दर फरक, दूधाचे पेमेंट, अनामत, कामगारांना बोनस आणि मेहनताना, व्यापारी देणे, चढ -उतार निधी रक्कम असे एकूण सुमारे ३७ कोटी रुपये रसबंधितांच्या बँक खात्यावरवर्ग करत असल्याची माहिती दूध संघाचे अध्यक्ष रणजितसिंह देशमुख यांनी दिली.

देशमुख म्हणाले की, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दूध संघाची वाटचाल कायमच कौतुकास्पद राहिलेली आहे. दूध संघाची मागील वर्षाची उलाढाल ५३८.१० कोटी रूपये झाली आहे. दूध संघाकडून दरवर्षी चांगल्या प्रतीच्या दूध पुरवठ्यावर दूध उत्पादकांना जास्तीत जास्त दूध दर फरक अदा करण्यात येतो. दूध संघाचे गुणवत्तेचे कामकाज व पारदर्शक कारभार यामुळे तालुक्यात ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली असून दूध उत्पादकांनी सहकारावर सातत्याने विश्वास ठेवलेला आहे. दूध उत्पादक व कामगारांना बोनस रक्कम अदा होत असल्यामुळे दूध उत्पादक, कामगार व व्यापारी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण झाले आहे. त्यामुळे तालुक्यात मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होणार आहे. तालुक्यात सहकारमहर्षी स्व. भाऊसाहेब थोरात यानी अथक परिश्रम घेऊन सहकारी संस्था स्थापन केल्या. त्यांचे अथक प्रयत्नामुळे सहकारी संस्थांची प्रगती झाली. दूध उत्पादक सभासदांचे सातत्याने हित जोपासताना दूध उत्पादकांना फायद्याचे ठरतील असेच निर्णय घेतले जातात.तालुक्यातील प्राथमिक सहकारी दूध संस्थांना किफायतशीर दूध भाव मिळणेकामी संगमनेर दूध संघास स्वच्छ व निर्भेळ दुधाचा पुरवठा करावा असे आवाहन संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र चकोर व कार्यकारी संचालक डॉ. सुजित खिलारी यांनी केले आहे.

# खर्च निरीक्षकांनी घेतला कामकाजाचा आढावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अकोले** : भारत निवडणूक आयोगामार्फत अकोले विधानसभा मतदारसंघासाठी खर्च निरीक्षक म्हणून नियुक्ती झालेले देबशीष बिस्वास यांनी अकोले विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्चविषयक कामकाजाचा आढावा घेतला.

निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव यांनी त्यांचे स्वागत केले. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सिद्धार्थ मोरे व खर्च पथकातील इतर अधिकारी उपस्थित होते. खर्च निरीक्षकांनी यावेळी सर्व नोडल अधिकारी व खर्च व्यवस्थापनासंदर्भात उपस्थित इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांना निवडणूक खर्च व्यवस्थापन वेळीच व योग्यप्रकारे करण्याच्या सूचना दिल्या. तसेच विधानसभा क्षेत्रनिहाय संवेदनशील भागाविषयी माहिती जाणून घेतली.उमेदवारी दाखल करणाऱ्या सर्व उमेदवारांच्या खर्चावर नोडल अधिकारी तसेच सहाय्यक खर्च निरीक्षकांनी लक्ष ठेवून दैनंदिन अहवाल विहीत वेळेत सादर करावेत. या निवडणुकीसाठी उमेदवारांच्या खर्चाचे मूल्यमापन करण्यासाठी दरनिश्चित करण्यात आले असून त्यानुसार उमेदवारांचा खर्चनिश्चित करावा, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. त्यांचा मुक्काम शासकीय विश्रामगृह संगमनेर येथे असणार आहे. त्यांचे संपर्क अधिकारी म्हणून अपर प्रवरा सब डिव्हीजनचे सहायक अभियंता प्रमोद माने यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खर्च निरीक्षक यांच्याशी निवडणूकविषयक प्रश्नाबाबत भेटीची वेळ ही सकाळी ११.०० ते १२.०० दरम्यानची निश्चित केली असून खर्च निरीक्षक यावेळेत अकोले तहसील कार्यालय (नवीन इमारत) येथे उपस्थित असतील. असे यादव यांनी कळविले आहे.

## द•ख•ल

### टाकळीभान येथे पोलीस पथकाचे पथसंचलन



**टाकळीभान** : विधानसभा निवडणूक अनुषंगाने श्रीरामपूर तालुका पोलीस स्टेशन तसेच इंडिया तिबेट बॉर्डर पोलीस यांच्या पथकाच्या वतीने टाकळीभान गावामध्ये पथसंचलन करण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी, अंमलदार यांची चार पोलीस वाहनत पथकात होती. पथसंचलनाद्वारे कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस यंत्रणेच्यावतीने जनतेला आवाहन करण्यात आले. पथसंचलनामध्ये श्रीरामपूरचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, पीएसआय मुरकुटे, पीएसआय शिंदे, सहायक फौजदार सतीश गोरे, राजू त्रिभुवन दादासाहेब लोंढे, बडे, चांद पठाण, अनिल शेंगाळे, बाबा सय्यद आदींसह पोलीस कर्मचारी व इंडिया तिबेट बॉर्डर पोलीस पथक सहभागी झाले होते.

### माजी आमदार मुरकुटेंच्या जामीनावर आज सुनावणी

**श्रीरामपूर** : राहुरी तालुक्यातील मांजरी येथील एका ३५ वर्षीय महिलेला गुंगीचे औषध देऊन तिच्यावर बलात्कार केल्या प्रकरणी न्यायालयीन कोठडीत असणाऱ्या माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या जामीन अर्जावर अहिल्यानगर येथील न्यायालयासमोर सुनावणी होऊन दोन्ही बाजूने युक्तिवाद झाला. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून उद्या (गुरुवारी) जामीनाबाबत निर्णय देणार आहे. राहुरी तालुक्यातील मांजरी येथील एका तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून विविध ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार केल्याप्रकरणी माजी आमदार भानुदास मुरकुटेवर गुन्हा दाखल होऊन त्याला पोलीस कोठडी सुनावली होती. त्यानंतर त्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास झाल्याने रुग्णालयात भरती केले. काल पुन्हा त्यांच्या जामीन अर्जावर सुनावणी होऊन उद्या गुरुवारी यावर निर्णय होणार आहे

### वडाळा महादेव येथे नोव्हेंबर महिन्यात शिबीर

**वडाळा महादेव** : येथील श्री श्री रविशंकर विद्या - मंदिर शाळेच्या प्रांगणात २५ ते २७ नोव्हेंबरला आर्ट ऑफ लिव्हिंगचे शिबिर होणार असल्याची माहिती समन्वयक पद्माकर कुलकर्णी यांनी दिली. प्रत्येक कुटुंब आनंदी असावे, मानसिक स्वास्थ्य पूर्ण हवे, योगा, प्राणायामाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक आरोग्य चांगले रहावे, यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून जागतिक पातळीवर प्रयत्न केले जातात. तालुक्यातील ५७ गावांमध्ये अशा वेगळ्या अभियानांद्वारे आनंद, आरोग्य, स्वास्थ्य या त्रिसुत्रीचा मंत्र देण्याचे काम होणार आहे. याचाच एक भाग म्हणून वडाळा महादेव येथे कार्यक्रम होणार आहे. अभियानासाठी शाळेचे संस्थापक अध्यक्ष संदीप कासार, शिक्षक महेश पठारे, एकनाथ जोंधळे, संजय सहाणे, पवन सरगये, बापू जाधव, तात्या भणगे, रमेश लबडे, सतीश आहेर, बॉबी बकाल, दिनेश चव्हाण, कुणाल करंडे, भरत जोंधळे, प्रकाश बडजाते, विजू सूर्यवंशी, भरत भाटिया, पप्पू भाटिया, रावसाहेब काळे, किशोर थोरात, राजेंद्र थोरात, जयवंत चौधरी, सोमनाथ महाले, सुजाता शेडगे, देवीदास चौधरी, मनीषा फरगडे आदी स्वयंसेवक प्रयत्नशील आहेत.

### महिला काँग्रेसच्या नूतन पदाधिकाऱ्यांची आज बैठक

**श्रीरामपूर** : आमदार लहू कानडे यांच्या यशोधन संपर्क कार्यालयात उद्या (गुरुवार) सकाळी ११ वाजता श्रीरामपूर विधानसभा महिला काँग्रेसच्या नूतन पदाधिकाऱ्यांची बैठक व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्रीरामपूर विधानसभा महिला काँग्रेसच्या अध्यक्षा प्रीती जगताप यांनी दिली. गेल्या आठवड्यात महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर जगताप यांनी विधानसभा महिला काँग्रेसची कार्यकारणी जाहीर केली. या कार्यकारणीतील नूतन पदाधिकाऱ्यांची बैठक तसेच पदाधिकाऱ्यांचा सत्कार आमदार कानडे यांच्या हस्ते तसेच श्रीरामपूर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष अरुण नाईक यांच्या अध्यक्षतेखाली ोणार आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ताप यांनी केले आहे.

### साईंची बदनामी करणाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

**शिर्डी** : करोडो साईभक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डीतील श्री साईबाबा आणि श्री साईबाबा संस्थानला काही अपप्रवृत्तीचे लोक विविध माध्यमातून बदनाम करण्याचे काम करीत आहे. युट्यूब, सोशल मिडियाच्या माध्यमातून अक्षेपार्ह वक्तव्य करुन हे लोक समाजात तेढ निर्माण करण्याच काम करीत आहे. याप्रकरणी शिर्डी नगरपंचायतचे माजी उपनगराध्यक्ष साईभक्त निलेश कोते यांनी दोघांविरोधात थेट पोलिसात फिर्याद दिली होती. कोते यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शिर्डी पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. श्री साईबाबांविषयी कोणतेही अक्षेपार्ह वक्तव्य आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर गुन्हे दाखल करणार असल्याचे कोते यांनी सांगितले.

## जाहीर प्रगटन

तहसील कार्यालय नेवासा
क्रमांक :/ जन्म-मृत्यू / एसआर /२२६/ २०२४
नेवासा दि.१४/१०/२०२४

अर्जदार श्री/कैलास गोरक्षनाथ आठरे, वरखेड ता.नेवासा यांनी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करून श्री/श्रीम. रखमाजी रामजी पडघन यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यू रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालीलप्रमाणे मृत्यू नोंद होणेबाबत नमूद केलेले आहे. अ.क्र.-१, मृत्यू नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव- रखमाजी रामजी पडघन, गावाचे नाव-माळेवाडी दुमाला, मृत्यू दिनांक-०८/०७/२०००. करिता या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यू नोंद गावी जन्म-मृत्यू रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित निबंधकास जन्म-मृत्यू नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, नेवासा**

## जाहीर नोटीस

जन्म मृत्यु अर्ज नं. /२०२४

श्री. विकी सुनील डोहे रा राहाता,
ता.राहाता, जि. अहमदनगर- **अर्जदार**
**विरुध्द**-मुख्याधिकारी नगरपरिषद राहाता,
ता. राहाता, जि.अहमदनगर-**सा. वाले**

**अर्जः-** जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये ज्या अर्थी अर्जदार हे नमुद पत्तावर राहात असुन अर्जदार श्री. विकी सुनील डोहे रा राहाता बु., ता.राहाता, जि. अहमदनगर याची आई नामे छाया सुनिल डोहे याचा मृत्यु दिनांक २७/०४/२०१७ रोजी राहाता ता. राहाता येथे मृत्यु झालेला आहे त्यांचे मृत्युची नोंद कोठेही झालेली नाही. अर्जदार यांना माहिती नसल्याने तसेच त्यांना जन्माची नोंद करणेविषयी कोणतीही माहिती छाया सुनिल डोहे यांचे मृत्युची नोंद करावयाचे राहुन गेलेले आहे. अर्जदाराना सदर मृत्यु दाखल्याची गरज असल्याने त्यानी राहाता ता राहाता जि. अहमदनगर येथे छाया सुनिल डोहे यांचे मृत्यु दाखल्या संबंधाने चौकशी केली असता छाया सुनिल डोहे याचे मृत्युची नोंद आढळुन येत नसल्याबाबतचे मृत्यु नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मुख्याधिकारी नगरपरिषद राहाता ता. राहाता जि. अहमदनगर यांनी दिले व मृत्यु दाखल्यासाठी मा. तहसिलदार याचे कडुन योग्य तो आदेश आणण्यास सांगितले. करीता सदरचा अर्ज केलेला आहे. त्या अर्थी छाया सुनिल डोहे यांचा मृत्यु दिनांक २७/०४/२०१७ रोजी राहाता झाला असुन मृत्यु तारखे बाबत कुणाचीही काहीही हरकत असल्यास त्यानी याविद्यमान न्यायालयात दि. ११/११/२०२४ रोजी ठीक ११.०० वाजता लेखी हरकत व कागदपत्रांसह हजर रहावे अन्यथा कुणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन अर्जदार यांना दि. २७/०४/२०१७ चा मृत्यु तारखेचा मृत्यु दाखला देण्यात येईल, ही जाहीर नोटीस दिली असे. आज रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले असे.

स्थळ- राहाता
दिनांक १/८/२०२४

(शिक्का) **तहसीलदार, राहाता**

## जाहीर नोटीस

जन्म मृत्यु अर्ज नं. /२०२४

श्रीम. शबाना गफुर पटेल, रा. शिर्डी, --**अर्जदार**
ता. राहाता, जि. अहिल्यानगर
**विरुध्द**-ग्रामपंचायत कार्यालय सावळीविहीर बु.
ता. राहाता जि.अहिल्यानगर-**सा.वाले**

**अर्जः-** जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये ज्या अर्थी अर्जदार हे नमुद पत्तावर राहात असुन अर्जदार श्रीम. शबाना गफुर पटेल रा शिर्डी ता राहाता जि.अहिल्यानगर याचा जन्म् दिनांक ०१/०३/१९८३ रोजी सावळीविहीर बु ता. राहाता जि. अहिल्यानगर येथे जन्म् झालेला आहे. त्यांचे जन्माची नोंद कोठेही झालेली नाही. अर्जदार यांना माहिती नसल्याने तसेच त्यांना जन्माची नोंद करणे विषयी कोणतीही माहिती नसल्याने श्रीम. शबाना गफुर पटेल रा शिर्डी ता राहाता जि. अहमदनगर यांचे जन्माची नोंद करावयाचे राहुन गेलेले आहे. अर्जदारांना सदर जन्म् दाखल्याची गरज असल्याने त्यांनी ग्रामपंचायत कार्यालय सावळीविहीर बु ता. राहाता. जि. अहिल्यानगर येथे श्रीम. शबाना गफुर पटेल रा शिर्डी ता राहाता जि. अहिल्यानगर यांचे जन्म् दाखल्या संबंधाने चौकशी केली असता. श्रीम. शबाना गफुर पटेल रा शिर्डी ता राहाता जि. अहिल्यानगर यांचे जन्माची नोंद आढळून येत नसल्याबाबतचे जन्म नोद अनुपलब्धता प्रमाणपत्र ग्रामपंचायत कार्यालय सावळीविहीर बु ता. राहाता. जि.अहिल्यानगर यांनी दिले व जन्म दाखल्यासाठी मा. तहसिलदार यांचे कडुन योग्य तो आदेश आणण्यास सांगितले. करीता सदरचा अर्ज केलेला आहे. त्या ग्रामपंचायत कार्यालय सावळीविहीर बु ता. राहाता. जि. अहिल्यानगर यांचा जन्म दिनांक ०१/०३/१९८३ रोजी मौजे सावळीविहीर बु ता. राहाता जि. अहिल्यानगर येथे झाला असुन जन्म तारखे बाबत अथवा जन्माबाबत कुणाचीही काहीही हरकत असल्यास त्यांनी या विद्यमान न्यायालयात दि. ११/११/२०२४ रोजी ठीक ११.०० वाजता लेखी हरकत व कागदपत्रांसह हजर रहावे अन्यथा कुणाचेही काहीही म्हणणे नाही असे समजुन अर्जदार यांना दि. ०१/०३/१९८३ चा जन्म तारखेचा जन्म दाखला देण्यात येईल, ही जाहीर नोटीस दिली असे. आज रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले असे.

स्थळ- राहाता
दिनांक - २२/१०/२०२४

(शिक्का) **तहसीलदार, राहाता**

## जाहीर प्रगटन

ज्या अर्थी श्री. /श्रीम. शिवाजी खंडेराव मुठे रा. मुठेवाडगांव ता. श्रीरामपुर जि. अहमदनगर यांचे कडील दिनांक १३/०८/२०२४ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमुद केले आहे की अर्जदार यांचे वडील नामे कै. खंडेराव प्रल्हाद मुठे हे मौजे मुठेवाडगांव ता. श्रीरामपुर येथे दिनांक १६/०७/२००५ रोजी मयत झालेला आहे. सदर अर्जदारचे वडील यांचे मृत्युची नोंद त्यांना जन्म मृत्यु कार्यालयात मिळुन आलेली नाही. त्यामुळे त्यांनी त्यांचे वडील यांच्या मृत्युची नोंद सरकारी दप्तरी लावायची आहे. यासाठी त्यांनी दिनांक १३/०८/२०२४ रोजी प्रतिज्ञापत्र दिले आहे.

उपरोक्त या जाहीर प्रगटना व्दारे तमाम जनतेला सुचित करण्यात येते की, वरील मृत्युचे दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरूपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित जन्माचा दाखला निर्गमित करण्यात येईल.

**तहसिलदार श्रीरामपूर**

(पान १ वरून)

## मविआचा ८५-८५-८५ फॉर्मुला

अत्यंत जबाबदारीनं सांगतो. आमच्या मित्रपक्षांसोबत चर्चा सुरु आहेत. आमच्या यादीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसच्या जागा असल्या तरी चर्चा सुरु आहेत. महाविकास आघाडीत आम्ही एकत्र आहोत आणि चर्चा सुरु आहेत, असं संजय पाटील म्हणाले. नाना पटोले यांनी तीन राजकीय पक्षांची बैठक शरद पवार यांच्यासमोर झाली. ८५-८५-८५ या जागांवर मिळून एकूण २७० जागांवर एकमत झालं आहे. उर्वरित १८ जागांवर शेकाप, कम्युनिस्ट, समाजवादी पक्षांसोबत चर्चा सुरु आहेत. उद्या या जागांवर आमच्यामध्ये स्पष्टता येईल. महाविकास आघाडी म्हणून ही निवडणूक लढत आहोत. महाराष्ट्रात मविआचं सरकार येईल, असं नाना पटोले म्हणाले. शरद पवार यांच्यासोबतच्या बैठकीनंतर मविआच्या सर्व पक्षाच्या नेत्यांनी पत्रकार परिषद घेत जागावाटपासंदर्भातील घोषणा केली आहे. मविआ १८ जागा कुणाला देणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. ठाकरेंच्या शिवसेनेकडून पहिल्या यादीत ६५ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. मात्र तिन्ही पक्षांकडून काही नावांची घोषणा करण्यात आली असली तरी त्यामध्ये बदल होतील, असं संजय राऊत म्हणाले.दरम्यान, मविआच्या तीन पक्षांकडून पहिल्या टप्प्यात ८५-८५-८५ जागा घेण्यात आल्या असल्या तरी ज्या जागांवरुन वाद होत्या त्या मागं ठेवण्यात आल्या आहेत. मविआकडून मित्रपक्षांना १८ जागा सोडल्या जातील असं सांगण्यात आलं. मुंबईत ठाकरेंच्या शिवसेनेकडून वांद्रे पूर्वमधून वरुण सरदेसाईंना उमेदवारी जाहीर करण्यात आली. तर, ज्या जागांवरुन वाद होता त्या भायखळा आणि वर्सोवा या जागांवरील उमेदवारांच्या नावांची घोषणा सेनेकडून करण्यात आलेली नाही. रस्त्यांमुळे सण-उत्सवाच्या आनंदावर विरजन! त्यामुळे सणाच्या काळात रस्त्यांची कामे थांबवून नागरिकांना सणाचा आनंद घेऊन द्या, असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. काहींनी याबाबत प्रशासनाकडे तक्रारी केलेल्या आहेत. परंतु कामे मंजूर झालेली आहे. ती वेळेत होणे गरजेचे आहे, असे सांगून नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले जात आहे.

## महायुतीने तिकीट कापलं, नाराज कोल्हेंनी दिल्ली गाठलं !

पक्ष फुटीमुळे कोपरगाव विधानसभा मतदारसंघात महायुतीसमोर मोठा पेचप्रसंग निर्माण झाला होता. कारण, महायुतीमध्ये ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाला देण्यात आली आहे. त्यामुळे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या मध्यस्थीने थेट दिल्ली गाठून गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. मंगळवारी रात्री उशिरा ही भेट झाल्याची माहिती आहे. दिल्लीतील या भेटीत कोल्हे परिवारास अमित शाह व फडणवीस यांनी शब्द दिल्याची माहिती आहे. त्यामुळे, कोल्हे कुटुंबीयांनी बंडखोरी न करता, महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करण्यासाठी मैदानात उतरण्याची तयारी दर्शवल्याचे समजते. देवेंद्र फडणवीसांना येथील बंडखोरी रोखण्यात यश आलं आहे.

माजी आमदार स्नेहलता कोल्हे ह्या आपल्या मुलासाठी म्हणजेच विवेक कोल्हे यांच्या उमेदवारासाठी आग्रही होत्या. मात्र, कोपरगाव मतदारसंघ अजित पवार गटाला गेल्याने अजित पवारांच्या पहिल्याच यादीत कोपरगाव मतदारसंघातून विद्यमान आमदार आशुतोष काळे यांना तिकीट देण्यात आलं आहे. त्यामुळे, येथील मतदारसंघात झालेली बंडखोरी शमविण्यासाठी थेट दिल्लीकरांकडून शब्द घ्यावा लागला आहे. त्यानंतर, महायुतीत बंडखोरी शमविण्यात पक्षश्रेष्ठींना यश आलं आहे. कोल्हेंना अमित शहा यांनी कोणता शब्द दिला? ज्यामुळे ते महायुतीच्या उमेदवाराचा म्हणजेच आमदार आशुतोष काळे यांचा प्रचार करण्यास राजी झाले, याबाबत जिल्ह्यात चर्चा सुरू आहे.

## बाबा सिद्दिकींच्या हत्या प्रकरणात अनमोल बिश्नोईचा सहभाग

जवळचे संबंध आणि दाऊद इब्राहिम सारख्या अंडरवर्ल्ड व्यक्तींशी कथित संबंधांमुळे त्याची हत्या करण्यात आलीय. लॉरेन्स बिश्नोई गँगने या हत्येची जबाबदारी घेतली होती.

अनमोल हा कॅनडा आणि अमेरिकेतून आरोपींच्या संपर्कात होता अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांनी आरोपींकडून चार मोबाईल जप्त केले आहेत. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने एका निवेदनात म्हटले आहे की, आरोपी स्नॅपचॅटच्या माध्यमातून एकमेकांसोबत संपर्क साधत होते. सूचना मिळाल्यानंतर ते मेसेज तात्काळ डिलीट करायचे. अटक केलेल्या आरोपींचे स्नॅपचॅट मेसेज जवळून तपासले असता, गोळीबार करणारे आणि सूत्रधार प्रवीण लोणकर हे अनमोल बिश्नोईच्या थेट संपर्कात असल्याचे उघड झाले आहे.

बाबा सिद्दिकी यांच्या हत्येसाठी वापरलेले पिस्तूल राजस्थानमधून आणले होते. पिस्तुल आणणाऱ्या आरोपींना ही अटक करण्यात आलीये. राम कनोजिया आणि भागवत सिंग, ओम सिंग यांनी हत्येसाठी वापरलेली तीन पिस्तुलांपैकी दोन राजस्थानातून आणली होती. दोन्ही पिस्तुल हे परदेशात बनवलेल्या आहेत. १२ ऑक्टोबर रोजी मुंबईतील वांद्रे भागात सिद्दिकी यांच्या हत्येसाठी ती वारपली गेली होती. या प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखा करत आहे. त्यांनी आतापर्यंत १० लोकांना अटक केली आहे. ज्यात हरियाणाचा रहिवासी गुरमेल सिंग आणि उत्तर प्रदेशचा रहिवासी धर्मराज कश्यप या दोन कथित शूटरचा समावेश आहे. तिसरा शूटर शिवकुमार गौतम हा खुनाच्या कटात सहभागी असलेल्या इतर काही लोकांसह फरार आहे. चौकशीत असे समोर आले की, कनोजिया आणि सिंग हे तीन महिन्यांपूर्वी पिस्तूल घेण्यासाठी राजस्थानला गेले होते. सिंग हा मूळचा उदयपूर, राजस्थानचा रहिवासी असून अटकेवेळी तो नवी मुंबईत भंगाराचा व्यवसाय करत होता.

## अखेर नागवडे पती-पत्नी हजारो कार्यकर्त्यांसह शिवबंधन बांधले

उद्धव ठाकरे यांनी नागवडे कुटुंबांच्या पक्षप्रवेशाबद्दल आनंद व्यक्त करत म्हणाले की; नागवडे कुटुंब हे सहकारातील अभ्यासू कुटुंब आहे. या कुटुंबांचे सहकार, कृषी, सिंचन, शिक्षण या क्षेत्रात मोठे योगदान लाभले आहे. सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे बापूंच्या अथक प्रयत्नातून श्रीगोंदा तालुका हा सर्व क्षेत्रात प्रगतीपथावर दिसून येत आहे. असे सांगून ठाकरे आणखी पुढे म्हणाले की; निश्चितच नागवडे कुटुंबाच्या या पक्षप्रवेशामुळे श्रीगोंदा तालुक्यात मशाल पेटणार आहे. त्यामध्ये पाचपुते कुटुंबातील साजन भैय्या पाचपुते यांचीही मोठी ताकद नागवडेंच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहणार आहे. कार्यकर्त्यांनी देखील विधानसभा निवडणूक पार पडेपर्यंत अनुराधाताई नागवडे यांच्या पाठीशी ठाम उभे राहावे; असे सांगून ठाकरे पुढे म्हणाले की; राज्यात महाविकास आघाडीची सत्ता येणार आहे. सर्वसामान्य माणूस महाविकास आघाडीचे सरकार येण्याची वाट पाहत आहे. त्यामुळे श्रीगोंदा तालुक्याच्या उर्वरित विकासासाठी सौ अनुराधाताई नागवडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे; असे आवाहन देखील शिवसेनाप्रमुख उद्धव ठाकरे व शिवसेना नेते संजय राऊत यांनी यावेळी पक्ष प्रवेश प्रसंगी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना स्पष्ट केले आहे.

## १०० हून अधिक विमानांना बॉम्बची धमकी

आयटी मंत्रालयाचे सहसचिव यांनी या बैठकीमध्ये सोशल मीडिया कंपन्यांच्या अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली आणि हे गुन्हेगारीला प्रोत्साहन देण्यासारखे आहे. अशा धोकादायक अफवा पसरवण्यापासून रोखण्यासाठी कोणती पावले उचलली आहेत, असा सवालही त्यांनी त्या प्रतिनिधींना केला. एअरलाइन्सच्या दोन अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या धमक्यांमुळे विमान कंपन्यांना सुमारे ६०० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज देखील वर्तविण्यात आलेला आहे.

## विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर

# धाराशिव निवडणूक उपजिल्हाधिकारी फरार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**धाराशिव :** बेहिशेबी मालमत्ता बाळगल्याप्रकरणी धाराशिवच्या निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी शिरीष यादव यांच्या विरोधात पुणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एक कोटी ३८ लाख रूपयांची बेहिशेबी मालमत्ता निदर्शनास आली असल्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या तक्रारीत नोंदविण्यात आले आहे. शुक्रवारी गुन्हा नोंद झाल्यापासून धाराशिवच्या निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी शिरीष यादव वॉन्टेड आहेत. विधानसभा निवडणूक २८ दिवसांवर येऊन ठेपल्यामुळे भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी उदयसिंह भोसले यांच्याकडे सध्या निवडणुकीचा अतिरिक्त पदभार सुपूर्द करण्यात आला आहे.

मंगळवारी विधानसभा निवडणूक नामनिर्देशनपत्र विक्री आणि दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली. तत्पूर्वी शुक्रवारपासून निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी पदाचा तात्पुरता पदभार असलेले शिरीष यादव सध्या फरार आहेत. त्यांचा पदभार मांजरा प्रकल्प-२ चे भूसंपादन अधिकारी उदयसिंह भोसले यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला आहे. तर अपर जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त पदभार सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी संतोष भोर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. शिरीष यादव यांच्यासह त्यांच्या पत्नीविरूध्दही बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याप्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. शासकीय सेवा कालावधीत मिळविलेल्या उत्पन्नापेक्षा जास्तीचे उत्पन्न त्यांनी बाळगले असल्याचे एसीबीच्या तक्रारीत समोर आले आहे. बेहिशोबी मालमत्ता जमा केल्याप्रकरणी त्यांची चौकशी सुरू होती. उत्पन्नाबाबतचा समाधानकारक खुलासा ते देवू शकले नाहीत. त्यामुळे यादव दाम्पत्याच्या विरोधात १७ ऑक्टोबर रोजी पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा नोंद केला आहे. तेंव्हापासून ते फरार आहेत.

**तपास सुरू आहे : उपाधीक्षक कटके**

मागील नऊ वर्षांपासून शिरीष यादव यांच्या बेहिशेबी मालमत्ता प्रकरणाचा छडा लावण्याचे काम सुरू आहे. काही महत्वपूर्ण धागेदोरे समोर आल्यानंतर शुक्रवारी त्यांच्याविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एकाच दिवशी तीन कारवाया झाल्यामुळे धाराशिवचे जिल्हाधिकारी यांच्याशी तातडीने पत्रव्यवहार झाला नाही. या कारवाईबद्दल मंगळवारी रितसर पत्र व्यवहार केला आहे आणि पुढील तपास सुरू असल्याची माहिती तपास अधिकारी तथा पुणे येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपाधीक्षक अनिल कटके यांनी दिली.

**रजेवर असल्यामुळे अतिरिक्त पदभार : जिल्हाधिकारी**

निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी शिरीष यादव यांच्याकडे अपर जिल्हाधिकारी पदाचाही अतिरिक्त पदभार होता. त्यांनी रजेवर असल्याचे कळविल्यामुळे अपर जिल्हाधिकारी म्हणून संतोष भोर यांच्याकडे पदभार सोपविला आहे. तर निवडणूक विभागाच्या कामकाजासाठी उदयसिंह भोसले यांना निवडणूक विभागाचा अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे. यादव यांच्यावर गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती माध्यमांतूनच समजली. गुन्हा दाखल झाल्याचे अधिकृत पत्र प्राप्त झाल्यानंतर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही केली जाईल, असे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

## दूर गेलेल्या कार्यकर्त्यांनी पुन्हा प्रवाहात सामील व्हावे : आ. गडाख

### बाजार समितीचे सभापती पाटील यांच्या स्नेहभोजन कार्यक्रमास उपस्थिती

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**नेवासा :** बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांच्यावतीने श्री ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजित स्नेहभोजन कार्यक्रमास आमदार शंकरराव गडाख यांनी उपस्थिती लावून कार्यकर्त्यांशी सुसंवाद साधला. तालुक्याच्या उत्कर्षासाठी हातात हात घालून सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याचा आपण प्रयत्न केला आहे. याआधीही तालुक्याच्या विकासासाठी गडाख-घुले यांनी जो आपल्याला विचार दिला तोच विचार बरोबर घेऊन तालुक्याच्या विकासासाठी व उत्कर्षासाठी हातात हात घालून आपण काम करू. त्यासाठी एकत्रित या. संघटनेपासून दूर गेलेल्या कार्यकर्त्यांनी पुन्हा प्रवाहात सामील व्हावे, असे आवाहन आ. शंकरराव गडाख यांनी यावेळी केले

जेष्ठ कार्यकर्ते रमहू पठाण, विजय गडाख, मुळा कारखान्याचे अध्यक्ष नानासाहेब तुवर, ज्ञानेश्वरचे संचालक अॅड. देसाई देशमुख, रामभाऊ जगताप, काकासाहेब शिंदे, रहेमान पिंजारी, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष गफूर बागवान, जुम्माखान पठाण, रावसाहेब कांगुणे, मार्केट कमिटीचे उपाध्यक्ष नानासाहेब नवथर, अरुण देशमुख, लक्ष्मणराव जगताप, बाळासाहेब झावरे, सरपंच सतीश निपुंगे, डॉ. शंकरराव शिंदे, अॅड. काकासाहेब गायके, महेश मापारी, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पटारे, विजय गांधी, मारुतराव घुले पतसंस्थेचे उपाध्यक्ष महंमद टेलर, शिवसेनेचे राजू काळे, बाळासाहेब वाघ, आप्पासाहेब बेद्रे, कैलास कुंभकर्ण, संचालक सुनील धायजे उपस्थित होते.

नंदकुमार पाटील यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. राज्यभर नावलौकिक असलेल्या नेवासा बाजार समितीच्या सभापतीपदी नेवासकर म्हणून मला काम करण्याची संधी दिली याबाबत आ. गडाख यांना धन्यवाद देत त्यांचे आभार मानले. शहराच्या उत्कर्षासाठी आ. गडाख यांनी भरीव निधी आणला म्हणून अनेकठिकाणी पेव्हर ब्लॉकची कामे, मठ-मंदिरांना सभामंडप देऊन दिलेला शब्द पाळला. त्यासाठी येत्या निवडणुकीत त्यांना मताधिक्य मिळवून देऊ असा निर्धार त्यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला. यावेळी आ. गडाख यांच्यासह उपस्थित मान्यवरांचा पाटील परिवाराच्यावतीने नंदकुमार पाटील, बाळासाहेब पाटील, प्रा.अजय पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

आ. डाख म्हणाले की नेवासा शहराच्या विकासासाठी सर्वात जास्त निधी मी मिळवला. त्यामध्ये काँक्रीट व डांबरी रस्ते, भुयारी गटारी, पेव्हर ब्लॉक, वाडयावस्त्यांवरील मंदिरांना सभामंडप अशी कामे केली. तालुक्यात चार महिन्यांपासून मी वाड्यावस्त्यांवर फिरत असल्याने कमीवेळा नेवासा शहरात आलो. विकासकामांना प्राधान्य देणे हीच विकासाची कल्पना असते. त्यासाठी प्रयत्न ही असतो. काम करण्याची संधी मिळाली त्यानुसार विकासकामांना प्राधान्य देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. घुले गडाख हे नाव नसून एक विचार होता. अनेकांनी तो विचार जोपासला. सर्वांना बरोबर घेऊन विकासात्मक कामे करायची हाच आपला प्रामाणिक हेतू असल्याचे सांगून शहरात असलेले दडपणाचे वातावरण दूर करून चांगले वातावरण तयार करण्यासाठी व शहराला भयमुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्रित या, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी झालेल्या स्नेह भोजन कार्यक्रम प्रसंगी बाजार समितीचे सर्व संचालक, कारखान्याचे संचालक, माजी नगरसेवक, विविध संस्थेचे पदाधिकारी, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विविध तरुण मंडळाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते. प्रा.अजय पाटील यांनी आभार मानले.



## आत्मविश्वास वाढण्यासाठी स्पर्धेत भाग घ्यावा : सालविठ्ठल

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** स्पर्धा ही केवळ नावाला असते. आत्मविश्वास वाढावा यासाठी स्पर्धेत भाग घेतला पाहिजे, असे प्रतिपादन उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल यांनी केले.

स्नेहबंध फाउंडेशनच्या वतीने आयोजित फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, अश्वमेध फॅशनचे संचालक मंगेश निसळ, अमित खामकर, सचिन पेंडुरकर, अमोल बास्कर, निशांत पानसरे, प्रतीक डहाळे, स्वयंम बास्कर आदी उपस्थित होते.

सालविठ्ठल म्हणाले, स्नेहबंध संस्थेच्या वतीने अत्यंत चांगली संकल्पना राबवली जात आहे. लहान मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा या हेतूने डॉ. शिंदे यांनी संस्थेच्या माध्यमातून राबवलेला हा उपक्रम स्तुत्य आहे. डॉ. शिंदे म्हणाले, स्नेहबंधच्या वतीने दरवर्षी फॅन्सी ड्रेस स्पर्धा, किल्ले बनवा स्पर्धा, तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले जाते. या फॅन्सी ड्रेस स्पर्धेतील विजेते इशानी खामकर, शौर्य तरवडे, शताक्षी आहेर, प्रिशा पळशीकर, निर्भय भोसले, रिया नकवाल यांना स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र, पदक व डायरी भेट देण्यात आली. प्रआभार अमित खामकर यांनी मानले.

## आंबीखालसा गावचे निसर्गप्रेम आदर्शवत : मोरे

### सह्याद्रीच्या कुशीतील निसर्गप्रेमींचा स्नेहमेळावा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** वाढते तापमान आणि पर्यावरणाचा असमतोलामुळे वृक्षांची कमी झालेली संख्या वाढविणे गरजेचे असून आंबीखालसा निसर्गप्रेमींनी नक्षत्रवन निर्माण करून निसर्ग वाचविण्याचे आदर्शवत काम केले आहे, असे प्रतिपादन निसर्ग व पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष प्रमोद मोरे यांनी व्यक्त केले. संगमनेर तालुक्यातील आंबीखालसा येथे निसर्गाच्या कुशीत वसलेल्या गावांमध्ये नुकतेच निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण मंडळाच्यावतीने स्नेहमेळावा आणि वनसहलीचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला वृक्षमित्र स्व. आबासाहेब मोरे व स्व. सुभाष मोरे यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्षा छाया राजपूत होत्या.

प्रास्ताविक व स्वागत राज्यसंघटक डॉ. शरद दुधाट यांनी केले. याप्रसंगी सरपंच बाळासाहेब ढोले, जालिंदर आहेर, संजय गायकवाड, प्रकाश केदारी, चंद्रकांत भोजने, उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे यांनी मनोगत व्यक्त केले. मंडळाच्यावतीने कृषी विद्यापीठ, राहुरी येथील सावित्रीबाई फुले विद्यालयास पुणे, सोलापूर व अहिल्यानगर या विभागातून ममुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळाफ या स्पर्धेत द्वितीय क्रमांक व १५ लाख रुपये पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल मोरे यांच्यावतीने उपमुख्याध्यापक बाळासाहेब डोंगरे व त्यांचे सहकारी यांचा सन्मान करण्यात आला. मोरे यांनी सांगितले की, आंबीखालसाला निसर्गाची देणगी मिळाली असून यात अधिक भर घालण्याचे काम येथील सरपंच बाळासाहेब ढोले, बाळासाहेब गाडेकर आणि ग्रामस्थ करीत आहेत. समाजातील विविध सुख-दुःखांच्या प्रसंगी आपल्या आवडत्या व्यक्तीच्या स्मृतिप्रीत्यर्थ झाडांचे रोपण करून त्यांच्या स्मृती कायम जागत्या ठेवाव्यात. राजपूत यांनी आंबीखालसा गावाचा आदर्श व प्रेरणा घेण्याचे आव्हान केले.

## स्टार हेल्थ इन्शुरन्सने होम हेल्थकेअर सेवा केली सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नगर :** भारतातील सर्वात मोठी स्वतंत्र आरोग्य विमा कंपनी स्टार हेल्थ इन्शुरन्स प्रचंड वाढीची क्षमता असलेली महत्त्वाची बाजारपेठ असलेल्या महाराष्ट्रातील आपले स्थान आणखी मजबूत करत आहे. महाराष्ट्रात ८८७ शाखांपैकी १०७ शाखा असल्याने राज्य स्टार हेल्थच्या विविधांगी जनतेला सर्वसमावेशक आणि प्रवेशयोग्य आरोग्य सेवा उपाय सुविधा पुरविण्याच्या ध्येयाच्या केंद्रस्थानी आहे. महाराष्ट्रातील १५ लाखांहून अधिक पॉलिसी धारकांना सेवा देणारे १.१५ लाखांहून अधिक एजंट्स आणि २०४० हून अधिक कर्मचाऱ्यांचे मजबूत नेटवर्क यातून ही बांधिलकी प्रतिबिंबित होते. आम्ही राज्यासाठी वचनबद्ध असून आर्थिक वर्ष २४ मध्ये १९०० कोटी रु.च्या दाव्यांची पूर्तता केली आहे आणि गेल्या ५ वर्षांत ७००० कोटी रु.च्या दावे पूर्ण केले आहेत.

स्टार हेल्थ इन्शुरन्सचे मुख्य विपणन अधिकारी हिमांशू वालिया म्हणाले, महाराष्ट्र हे स्टार हेल्थ इन्शुरन्समधील आमच्या व्यवसायाच्या कार्यपद्धतींचा कणा आहे. येथील विविधांगी जनता आणि प्रगत आरोग्यसेवा परिसंस्थेने आम्हाला सर्वसमावेशक विमा उपायसुविधा वितरीत करण्यासाठी एक आदर्श व्यासपीठ दिले आहे. आमच्या होम हेल्थकेअर सेवा आणि ब्रेल पॉलिसीची ओळख यासारख्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून नागरिकांसाठी प्रवेशयोग्यता, समावेशकता आणि एकूण आरोग्य सेवा अनुभव सुधारण्याप्रती असलेली आमची बांधिलकी दिसून येते. या महत्त्वाच्या बाजारपेठेला प्राधान्य देऊन, आम्ही महाराष्ट्रातील कुटुंबांच्या आरोग्य आणि कल्याणावर दीर्घकालीन परिणाम करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

महाराष्ट्रातील नाविन्यपूर्ण होम हेल्थकेअर सेवा नवकल्पना आणि सुलभता यांच्याप्रति असलेली बांधिलकी आणखी मजबूत करत स्टार हेल्थ इन्शुरन्स ने ५० हून अधिक शहरांमध्ये पसरलेल्या राष्ट्रीय उपक्रमाचा भाग म्हणून मुंबई आणि पुण्यात आपली होम हेल्थकेअर सेवा सुरू केली आहे. जलद दावे निकाली काढण्यास आणि स्वस्त आणि उच्च-गुणवत्तेची काळजी घेण्यासाठी डिझाइन केलेल्या सेवेसह प्रवेशयोग्यता सुनिश्चित करत ही सेवा ग्राहकांना त्यांच्या घरीच आरोग्यसेवा मिळविण्याची सुविधा देते. महाराष्ट्राने या सेवेसाठी मजबूत मागणी दर्शवली असून चालू आर्थिक वर्षात एकूण होम हेल्थकेअर कॉलपैकी ४० टक्के कॉल या राज्यातून आले आहेत. सध्या, स्टार हेल्थची होम हेल्थकेअर सेवा महाराष्ट्रातील ८५ टक्के ठिकाणी उपलब्ध आहे आणि ग्रामीण भागातही ही सेवा विस्तृत करून प्रवेशयोग्यता वाढवण्याचे आणि वंचित समुदायांच्या आरोग्यसेवा गरजा पूर्ण करण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

स्टार हेल्थ इन्शुरन्सद्वारे हाती घेण्यात आलेला आणखी एक आरोग्यस्वास्थ्य उपक्रम म्हणजे माइंड हेल्थ प्रोग्राम आहे. हा उपक्रम ताण, चिंता, पॅनिक अटॅक, ऑब्सेसिव्ह-कंपल्सिव्ह डिसऑर्डर आणि खाण्यासंदर्भातील विकारांचा समावेश असलेल्या विविध मानसिक आरोग्य आव्हानांना हाताळण्यास व्यक्तींना सक्षम करण्यासाठी डिझाइन केला गेला आहे. मौल्यवान स्त्रोत आणि पाठबळ उपलब्ध करून देत हा कार्यक्रम मानसिक आरोग्याच्या कल्याणासाठी रचनात्मक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन सादर करतो. स्वास्थ्य लाभ समाविष्ट असलेल्या धोरणांसह सर्व ग्राहकांसाठी समर्पित माइंड हेल्थ वेलनेस प्रोग्राम सादर करणारी स्टार हेल्थ ही पहिली विमा कंपनी आहे. स्टार हेल्थ राज्यात आपला ठसा विस्तारत असताना कंपनी महाराष्ट्रभरातील लाखो लोकांचे जीवन बदलवून टाकणाऱ्या नाविन्यपूर्णता, सर्वसमावेशकता आणि समाजकेंद्री आरोग्य सेवा उपायसुविधा वितरीत करण्यास वचनबद्ध आहे.


## नावात बदल

माझे जुने नांव विशाल शंकर सुरडकर (पॅनकार्ड) असुन नवे नांव विशाल शंकराव सुरडकर (माझे आधार कार्ड वरील नांव) असे आहे. दोन्ही नांवाच्या व्यक्ती वेगळ्या नसुन एकच आहेत. प्रतिज्ञापत्र नंबर २४५२ २४२० ४१२६८ १००५ २८७३० दिनांक - २२/१०/२०२४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

गुरूवार दि. २४ ऑक्टोंबर २०२४

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-६-८ मजबुत |
|---|---|---|---|
| १५९<br>३५७<br>५०० | ५-७ | १२४<br>१७९<br>११५ | जोड<br>५१-६७-६०-८४-७३ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ६-८-२ मजबुत |
|---|---|---|---|
| १५०<br>२४०<br>३३० | ६-१ | १४०<br>२९०<br>२२७ | जोड<br>६३-७१-८०-२४-१५ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ७-१-३ मजबुत |
|---|---|---|---|
| १६०<br>२५०<br>७०० | ७-६ | १६९<br>२६८<br>४९७ | जोड<br>७२-०६-१९-३४-६५ |


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## द•ख•ल

### साईदास परिवार ट्रस्टच्या विश्वस्तपदी विजय चौधरी

**अहिल्यानगर** – अहिल्यानगर मध्ये श्री साईदास परिवार नगर ते शिर्डी श्रावनमास निमित्त पायी पालखी काढत असते. या पालखीचे हे २२ वे वर्ष आहे. तसेच दुसऱ्या गावातील पालखी नगर मार्गे जातात त्यांचे मुकामाचे व महाप्रसादाचे नियोजन साईदास परिवाराच्या वतीने करण्यात आले. वर्षात १३ पालख्या असतात. त्यासर्व पालख्यांमधील भाविकांना सेवा देण्याचा काम या साईदास परिवार ट्रस्टच्या वतीने करण्यात येते. साईदास परिवाराचे अध्यक्ष अजय काळे यांनी विजय चौधरी यांनी ट्रस्टच्या विश्वस्तपदी विजय चौधरी यांनी निवड करुन नियुक्तीचे पत्र देण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष शंकर बोरुडे, खजिनदार निशिकांत शिंदे, सेक्रेटरी संजय बनसोडे विश्वस्त लक्ष्मीकांत तिवारी, प्रकाश म्हस्के यांनी विजय चौधरी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.

### भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने पौर्णिमानिमित्त विविध कार्यक्रम

**अहिल्यानगर** – अहमदनगर शहरात प्रथमच आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा तीन महिने वर्षावास मालिकेचे आयोजन भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेच्या वतीने सिद्धार्थ बुद्धविहार, सिद्धीबाग अहमदनगर येथे आयोजित करण्यात आले. यावेळी धम्म देसना देण्यासाठी वरिष्ट केंद्रीय शिक्षक ज्ञानोबा कांबळे गुरुजी, पुण्या येथुन आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. राम गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाध्यक्ष आयु.भगवंत गायकवाड व जिल्हा सरचिटणीस राजेंद्र साळवे व महिला अध्यक्ष सुनीता गायकवाड होते. यावेळी चैत्यभूमी विद्यापीठ मुंबई, येथे,केंद्रीय शिक्षकधम्म प्रशिक्षण या परीक्षेत देशात व राज्यात पहिले आलेले प्रा. विजय हुसळे सर,व देशात आठवे व राज्यात दुसरे आलेले, राजेंद्र साळवे साहेब, तसेच देशात नववे व राज्यात तिसरे आलेले प्रा. राम गायकवाड यांचा व नूतन महिला अध्यक्ष सुनीता गायकवाड व उपाध्यक्ष अर्चना गायकवाड व कार्यालयीन सचिव सिंधू साळवे व संपूर्ण महिला कार्यकारणी यांचा ट्रॉफी ,शाल, बुके देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी माधवराव चाबुकस्वार,सूत्रसंचालन संतोष गायकवाड, शहर सरचिटणीस बनकर बाळासाहेब, तालुका अध्यक्ष प्रकाश कांबळे,विजय चाबुकस्वार,शेवगाव अध्यक्ष अरुण भोंगळे,रवींद्र कांबळे, काका गायकवाड,अरूण तुपे,बापूसाहेब शिंदे,निलेश भालेराव आदी उपस्थित होते.

### डॉ.श्रीकांत पठारे यांना उमेदवारी नाकारल्याने शिवसैनिकांमध्ये नाराजी

**पारनेर :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघात महाविकासघाडीकडून खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. डॉ.श्रीकांत पठारे हेही महाविकासआघाडीकडून इच्छुक होते व लोकसभा निवडणुक झाल्यानंतर त्यांनी विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरु केली होती व त्यांना तसे संकेतही देण्यात आले होते. तसेच उमेदवारी अर्ज घेण्यास सुरुवात झाल्यानंतर त्यांच्यासाठी व त्यांच्या पत्नीच्या नावे पक्षाच्या वतीने उमेदवारी अर्जही त्यांच्या समर्थकांनी खरेदी केले होते. परंतु डॉ.श्रीकांत पठारे यांना उमेदवारी देण्यात न आल्याने पारनेर तालुक्यातील शिवसैनिकांमध्ये व त्यांच्या समर्थकांमध्ये प्रचंड नाराजीचा सुर पहावयास मिळाला व शिवसैनिकांमध्ये अन्यायाची भावना पसरल्याचे चित्र पहावयास मिळाले. डॉ.श्रीकांत पठारे यांच्या निवासस्थानी शिवसैनिकांनी रात्री उशीरापर्यंत गर्दी केली होती, याच पार्श्वभुमीवर त्यांनी गुरुवार दि.२४ ऑक्टोबर रोजी सकाळी ९:३० वा. आनंद मंगल कार्यालयात शिवसैनिकांच्या मेळाव्याचे आयोजन केले आहे. सोशल मीडियात नाराजीचा सुर उमटला असून अन्याय झाल्याची भावना निर्माण झाली असल्याने सर्वच शिवसैनिकांशी संवाद साधण्यासाठी व त्यांच्या भावना जाणून घेण्यासाठी शिवसन्मान मेळाव्याचे आयोजन केले असल्याची प्रतिक्रिया डॉ.श्रीकांत पठारे यांनी दिली आहे.

# भ्रष्ट उमेदवाराविरोधात मतदारांमध्ये जागृती करणाऱ्या आंदोलकांना नोटिसा

## संविधानाच्या मूलभूत अधिकाराला पायदळी तुडवून अत्याचार सहन केला जाणार नसल्याचा संघटनेचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : भ्रष्ट उमेदवार पाडून चांगले उमेदवार निवडून आणण्यासाठी जनआंदोलनाच्या माध्यमातून जागृती करणाऱ्या पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेच्या आंदोलक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविणाऱ्या विशेष कार्यकारी दंडाधिकारी व तोफखाना पोलीस स्टेशन विरोधात भारतीय निवडणुक आयोगाकडे संघटनांनी तक्रार नोंदवली आहे. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकाऱ्यांना पायदळी तुडवून कोणताही अत्याचार सहन केला जाणार नसल्याचा व याप्रकरणी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्याचा इशारा ॲड. कारभारी गवळी यांनी दिला आहे.

विधानसभा निवडणुकीत लोकमकात्या उमेदवारांच्या विरुद्ध जय शिवाजी, जय डिच्चू काव तंत्राचा वापर करण्याचा आणि या महामंत्राने निवडणुकीत लोकमकात्यांना पाडण्यासाठीच्या प्रचारामुळे पीपल्स हेल्पलाइन आणि भारतीय जनसंसदेचे ड. कारभारी गवळी, अशोक सब्बन यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांनी तोफखाना पोलीस यांच्या फिर्यादीवरुन नोटीसा काढून ६ महिन्यांसाठी १० हजार रुपयांचा बॉण्ड देण्याचे आदेश का करू नये? अशी कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे.

या संघटनेने सातत्याने लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती नसणाऱ्या उमेदवारांच्या विरुद्ध लोकशाही डिच्चू कावा आणि लोकशाही डिच्चू फत्ते हा महामंत्र राबण्याचा प्रचार केला. त्यामुळे या संघटनांना पोलिसांनी आळा बसविण्यासाठी आणि निवडणूक काळात जय शिवाजी, जय डिच्चू कावा या तंत्रामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, असा गैरसमज करून चॅप्टर केसेस भरल्या आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह शेकडोपटीने वाढला आहे. सत्ताधारी मंडळी सत्तेचा दुरुपयोग कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी करण्यासाठी वापरत आहे. मतकोंबाड आणि लोकमकात्या घोषणामुळे सत्तापेंढारी यांचे धाबे दणाणले असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

भारतीय संविधानाने विचार स्वातंत्र्य आणि मत स्वातंत्र्य यांना मूलभूत अधिकारामध्ये ठेवले आहे. परंतु सत्ताधारी मंडळी निवडणूक आयोगाचे आचारसंहितेचा भंग होतो आणि जय शिवाजी, जय डिच्चू कावा या घोषणेमुले मतदारांमध्ये क्रांती होऊ शकते, अशा भीतीमुळे सत्याग्रही कार्यकर्त्यांच्या विरुद्ध बनावट खटले दाखल करीत असल्याचा आरोप ड. गवळी यांनी केला आहे.

आमच्या कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी पोलिसांच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांना करता येणार नाही. निवडणूक आयोग व पोलिसांना उच्च न्यायालय समोर याचिकेद्वारे घटनाबाह्य कारवाईला आव्हान दिले जाणार असल्याचेही ॲड. गवळी यांनी स्पष्ट केले आहे.

मागील निवडणुकांमध्ये सुद्धा खोटे खटले दाखल करून कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी करण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या वतीने काम करणारे सरकारी अधिकारी सत्ताधाऱ्यांचे बटीक आहेत. सारासार विवेक गहाण ठेवून आणि भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांना पायदळी तुडवून कोणत्याही अत्याचार सहन केला जाणार नसल्याचा इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

### राहुल जगताप अपक्ष उमेदवारी करणार का?

राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या शरद पवार गटाकडून विधानसभा निवडणुकीसाठी तालुक्याचे माजी आमदार राहुल जगताप हे मोठ्या प्रमाणात इच्छुक होते त्यांना शरद पवार यांनी शब्द दिला होता मात्र महाविकास आघाडीतील शिवसेनेला जागा गेल्याने अडचण निर्माण झाली आहे मात्र तरीही राहुल जगताप अपक्ष उमेदवारी करणार असे खुलेआम बोलले जात आहे.

### मैत्रीपूर्ण लढत होणार ?

शिवसेनेच्या उबाठा गटाकडून अनुराधा नागवडे याना उमेदवारी मिळताच त्यांनी महायुतीची लढत हि हेवेदावे बाजूला ठेवून मैत्रीपूर्ण होणार असल्याचे अनेक मॅसेज शोषलं मीडियावर फिरताना दिसत होते त्यामुळे हि लढत मैत्रीपूर्ण होणार कि नाही याकडे तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.

### लढत बहुरंगी होण्याची शक्यता ?

श्रीगोंदा – नगर विधानसभा मतदार संघात उमेदवारांचे वाढते संख्याबळ पाहता किती बंडखोर उमेवार शमवण्यात यशस्वी होतील हे चित्र स्पस्ट होत नसल्यामुळे निवडणूक बहुरंगी होण्याची शक्यता नाकारत येत नाही.

## शेलार, नागवडे, पाचपुते, शेळके यांच्यासमोर

# बंडखोरी रोखण्याचे तगडे आव्हान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : आतापर्यंत भाजपच्या प्रतिभा पाचपुते वंचित आघाडीचे आण्णासाहेब शेलार तसेच अनुराधा नागवडे तसेच मनसेचे संजय शेळके यांना उमेदवारी जाहीर झाली आहे मात्र तालुक्यातील अनेक इच्छुक बंडखोरी करणार असल्यामुळे उमेदवार यांच्या समोर बंडखोरी रोखण्याचे मोठे आव्हान आहे असे म्हणणे काही वावगे ठरणार नाही.

श्रीगोंदा – नगर विधानसभा मतदार संघात उमेदवारीसाठी अनेकजण इच्छुक असल्याने पक्ष श्रेष्ठीची उमेदवारीसाठी चांगलीच दमछाक झाल्याचे चित्र पाहण्यास मिळाले दरम्यान कालावधीत सत्तेतील भाजपने ९९ उमेदवारांची यादी प्रशिध्द केली त्यामध्ये राज्याचे माजी मंत्री व विद्यमान आमदार बबनराव पाचपुते याच्या धर्मपत्नी प्रतिभा पाचपुते यांना उमेदवारी पहिल्याच यादीत जाहीर केली त्यावेळी भाजपच्या निष्ठावंत सुवर्णाताई पाचपुते यांनी बंडखोरी करणार असल्याचे जाहीर केले त्यानंतर शरद पवार याच्या राष्ट्रवादी काँग्रेस मधून तिकिटासाठी मोठी रस्सीखेच चालू असताना सुरवातीला माजी आमदार राहुल जगताप, अण्णासाहेब शेलार यांच्यासह अनेकांना उमेदवारी मिळणार असे बोलले होते दरम्यान नागवडे कुटुंबियांना अजित पवार गटातून विधानसभेची उमेदवारी मिळणार नसल्याचे त्यांनी अजित पवार गटाला राम राम ठोकत त्यांनी मुंबईत हातावर शिवबंधन बांधून घेत शिवसेनेत प्रवेश करत उमेदवारी फायनल केली आहे महाविकास आघाडीतील घटक पक्षातील शिवसेना उबाठा गटातून अनुराधा नागवडे याना उमेदवारी जाहीर झाल्यावर राहुल जगताप याच्या समर्थकांतून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त केली होती तसेच महायुतीमधील एक घटक पक्ष काँगेस चे तालुक्यातील नेते घनश्याम शेलार याना उमेदवारी मिळत नसल्यामुळे ते बंडखोरी करण्याच्या तयारीत आहेत त्यामुळे तालुक्यातील वंचित आघाडीचे आण्णासाहेब शेलार,शिवसेना उबाठा गटाच्या अनुराधा नागवडे,तसेच भाजपच्या प्रतिभा पाचपुते मनसेचे संजय शेळके याना तालुक्यातील अनेक बंडखोर यांच्यासह अपक्ष उमेदवार यांची मनधरणी करून बंडखोरी रोखण्याचे तगडे आव्हान त्याच्यासमोर आहे असे खुलेआम बोलले जात आहे

# ‘व्यंकटेश’च्या माध्यमातून लहान-मोठे उद्योजक तयार झाले : राजपुरे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : सन २०१३ साली बालमटाकळी येथील भूमिपुत्र तथा व्यंकटेश उद्योग समूहाचे सर्वेसर्वा अभिनाथ शिंदे, अनिल गुंजाळ, कृष्णा मसुरे तसेच व्यंकट देशमुख या चौघांनी एकत्र येत लावलेल्या रोपट्याचे आज महावटवृक्षात रूपांतर होऊन महाराष्ट्रातच नव्हे तर इतर राज्यात ५० शाखेचे जाळे तयार करून शेकडो युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून व्यंकटेश उद्योग समूहाने बालमटाकळी गावचे देशभरात नावलौकिक वाढवून आज गावच्या वैभवात भर पडली आहे, व्यंकटेश मल्टीस्टेट आणि फाऊंडेशन समाजाच्या हितासाठी नेहमीच नवनवीन उपक्रम राबवत असून याचा सर्वांनाच मोठा फायदा होत असतो. व्यंकटेशच्या माध्यमातून या भागात अनेक लहान मोठे उद्योजक तयार झाले आहेत, या उद्योग समूहाने या संस्थेकडे व्यवसाय म्हणून न पाहता यामधून गोर गरीबांचे, सर्वसामान्यांचे भले कसे होईल याकडे प्रामुख्याने लक्ष दिले असल्याचे प्रतिपादन शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथे व्यंकटेश मल्टीस्टेट आणि व्यंकटेश फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. २३ रोजी बालमटाकळी येथील व्यंकटेश मल्टीस्टेटच्या शाखेच्या ११ व्या वर्धापन दिनानिमित्त परिसरातील ग्रामस्थांसाठी मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या आरोग्य शिबिरात १५५ रुग्णांनी घेतला लाभ आहे. यावेळी आयोजित कार्यक्रमात शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे हे बोलत होते.

यावेळी ज्ञानेश्वर कारखान्याचे माजी संचालक मोहनराव देशमुख, बालमटाकळी सेवा संस्थेचे माजी चेअरमन हरिचंद्र घाडगे, सुदामराव शिंदे, माणिकराव शिंदे, अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष कमुभाई शेख, व्यंकटेशचे सहसंस्थापक अनिल गुंजाळ, युवा नेते व्यंकटराव देशमुख, भारतराव घोरपडे, अरुण बामदळे, बाबासाहेब घाडगे महाराज, बाळासाहेब जाधव, नामदेव घाडगे, सुभाष वैद्य, दामोदर वैद्य, रावसाहेब भाकरे, सचिन राजपुरे, झोनल मॅनेजर ज्ञानेश्वर काकडे, विभागीय अधिकारी प्रशांत शित्रे, बाळासाहेब राजपुरे, शाखाधिकारी अमर गरड, राजेंद्र अंतरकर कर्मचारी योगेश गलधर, वैद्य मोहन, अंतरकर अजय, सानप दीपक, पांडुरंग सपकाळ, साईकृपा नेत्रालयाचे डॉ. आर्यन कराळे, डॉ. प्रियंका हरेल, डॉ. अश्विनी मरकड, डॉ. काजल सानप यांच्यासह सभासद, ग्राहक, महिला आणि शेतकरी वर्गासह स्थानिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य शिबिराचा लाभ घेतला.

# जामखेडच्या पुरवठा विभागात अनागोंदी कारभार

## पुरवठा विभाग ‘असून अडचण नसून खोंळबा’



(छाया : समीर शेख)

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : जामखेड येथील तहसील कार्यालयात असलेल्या पुरवठा विभागात अनागोंदी कारभार सुरू असुन पुरवठा विभागाला पुरवठा अधिकारीच नाही या ठिकाणी महीला व जेष्ठ नागरिकांची रेशन ऑनलाईन ची कामे होत नसल्याने नागरीक वैतागले आहेत. परीणामी नागरीकांची ससेहेलपट न थांबल्यास येणाऱ्या काही दिवसात तहसील कार्यालयासमोर जेष्ठ नागरीकांन समवेत धरणे आंदोलन छेडण्याचा इशारा येथील सामाजिक कार्यकर्ते रमेश आजबे यांनी दिला आहे.

जामखेड येथील पुरवठा विभागात वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक महिला या पुरवठा विभागात हेलपाटे मारून हैराण झाले आहेत. गेल्या सहा महिन्यांपासून यापुरवठा विभागात नविन रेशन कार्ड ऑनलाइन करणे, विवाहित मुलीचे नाव कमी करणे, नवीन विवाहित सुनांचे नाव समाविष्ट करणे, तसेच मयताचे नाव कमी करणे, धान्य मिळवण्यासाठी कुपन ऑनलाईन करणे यासाठी नागरिक पुरवठा विभागात हेलपाटे मारत आहेत.

यासर्व गोष्टी ऑनलाइन करण्यासाठी दररोज तहसील कार्यालयातील जेष्ठ नागरिक देखील पुरवठा विभागाचे उंबरठे झिजवत आहेत पण त्या कार्यालयात पुरवठा अधिकारीच महिला व नागरीकांना दिसत नाही

याठिकाणी पुरवठा विभागात सक्षम अधिकारी नसल्याने पुरवठा विभागाचा बोजवारा उडाला आहे. यासर्व गोष्टींवर मार्ग काढण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते रमेश आजबे यांनी आवाज उठवला आहे. या नागरिकांना घेऊन त्यांनी तहसील कार्यालयासमोर या सर्व प्रश्नांबाबत जाब विचारला या ठिकाणी दिलेले सर्व अर्ज अस्ताव्यस्त पडलेले असून एक वर्षांपूर्वी दिलेले अर्ज त्याचाही अद्याप शोध लागत नाही यामुळे नागरिक त्रस्त झालेले आहेत.

या पुरवठा विभागात येणाऱ्या जेष्ठ नागरिक व सर्वसामान्य नागरिकांची जर वारंवार हेलपाटे थांबली नाही तर येत्या काही दिवसात तालुक्यातील सर्व जेष्ठ नागरिकांना घेऊन तहसील कार्यालयाच्या समोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते रमेश आजबे यांनी दिला आहे. यावेळी त्यांच्या समवेत तालुक्यातील बहुसंख्य नागरिक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मतदानाचा हक्क बजावणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य : रामनाथ कराड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



(छाया : राजेंद्र भंडारी)

**पाथर्डी** : जगामध्ये भारत हे सर्वात मोठे लोकशाही प्रधान राष्ट्र आहे.या मध्ये निवडणूक प्रक्रिया व मतदान या अतिशय महत्त्वाच्या बाबी आहेत.सक्षम लोकशाहीच्या बळकटीसाठी,योग्य लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी मतदानाचा हक्क बजावणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे असे प्रतिपादन मतदान जनजागृती मोहिमेचे नोडल अधिकारी रामनाथ कराड यांनी केले.

शहरातील श्री तिलोक जैन विद्यालयात मतदार जनजागृती अभियान प्रसंगी ते बोलत होते. शेवगाव पाथर्डी विधानसभा निवडणुक निर्णय अधिकारी प्रसाद मते व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.उध्दव नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात मतदान जनजागृती मोहिम अंतर्गत तालुक्यांत विविध उपक्रम राबविले जाणार आहेत.येणाऱ्या शेवगाव पाथर्डी विधानसभा निवडणुकीत प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावला पाहिजे.जिल्हा अधिकारी यांनी घोषित केलेले मिशन ७५ टक्के पेक्षा अधिक मतदान प्रत्येक केंद्रावर व्हावे यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांसह समाजात जनजागृती करणे आवश्यक असल्याचे कराड यांनी सांगितले.यावेळी व्यासपीठावर श्री तिलोक जैन विद्यालयाचे प्राचार्य अशोक दौंड,पर्यवेक्षक दिलावर फकीर,सुधाकर सातपुते,मतदान जनजागृती अभियानाचे सदस्य भारत गाडेकर,बिपिन खंडागळे,अतुल तरवडे,संतोष घोगरे, बाळासाहेब मरकड,गहिनीनाथ शिरसाट उपस्थित होते.या जनजागृती अभियानाच्या निमित्ताने विद्यालयात विविध प्रकारचे उपक्रम राबवण्यात आले.यामध्ये मतदान जनजागृती पर रांगोळी स्पर्धा,निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.यावेळी शाहीर भारत गाडेकर यांनी मतदान जागृती करण्याच्या दृष्टीने मतदार गीत सादर केले.तसेच बिपिन खंडागळे यांनी काव्यवाचन करून मतदान करण्याबाबतची प्रतिज्ञा सामूहीक रूपात दिली.यावेळी सर्व विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती अभियान राबवण्याबाबतची संकल्प पत्रे सादर केली केली.तसेच निबंध स्पर्धा व रांगोळी स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली .या संपूर्ण कार्यक्रमाची प्रसिद्धी प्रमुख म्हणून संतोष घोगरे यांनी जबाबदारी पार पाडली.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य अशोक दौड यांनी केले तर सूत्रसंचालन सुनिल कटारिया यांनी करून आभार पर्यवेक्षक दिलावर फकीर यांनी मानले.


**कावि/फौज/आवक क्र ४५-२०२४**
**जन्मकावि/फौज/जन्म- मृत्यु/१५ ऑगस्ट २००६**
**तहसील कार्यालय, जामखेड जि. अहमदनगर**

**जाहीर प्रगटन**

अर्जदार **युनूस गफूर पठाण रा फक्राबाद ता जामखेड** सामनेवाले कोणी नाही मा. तहसिलदार सो. जामखेड यांनी वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द करणेबाबत दि.१९/०७/ २०२४ रोजी दिलेल्या पत्रावरून याद्वारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंदणी सुधारणा कायदा २०२३ नुसार अर्जदार यांनी **चांदबी उमराव पठाण** यांचा मृत्यु मौजे फक्राबाद ता जामखेड यांचे राहते घरी दिनांक १५ऑगस्ट२००६ रोजी झालेला आहे. परंतु त्यांचे मृत्युची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९७६ नुसार ग्रा.पं. फक्राबाद ता. जामखेड जि. अहमदनगर येथे झालेली नाही. सदर नोंद घेणे बाबत अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे. परंतु त्यांचे मृत्युची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९७६ नुसार ग्रा.पं. फक्राबाद ता. जामखेड जि. अहमदनगर येथे झालेली नाही. सदर नोंद घेणे बाबत अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.त्याअर्थी मयत नामे चांदबी उमराव पठाण यांचे मृत्युचे नोंद घेणेबाबत कोणाचाही आक्षेप किंवा काही म्हणणे असल्यास त्यांनी सदरनोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून एक महिन्याचे आत आपल्या लेखी हरकत कागदपत्राच्या पुराव्यानिशी मा. तहसिलदार सो. जामखेड यांचे कडे लागलीच सादर करावे. अन्यथा अर्जदाराचा पुरावा घेवुन सदर अर्जदाराचा अर्जावर योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**दिनांक १९/०७/२०२४**
**स्थळ जामखेड**

**ॲड.व्ही.एम.देशमुख**
अहमदनगर



**कावि/फौज/ आवक क्र ४४-२०२४**
**जन्म- मृत्यु/ ०२ नोव्हेंबर २०१९**
**तहसिल कार्यालय, जामखेड जि. अहमदनगर**

**जाहीर प्रगटन**

अर्जदार **राहील महेबूब शेख रा धानोरा ता जामखेड** सामनेवाले कोणी नाही मा. तहसिलदार सो. जामखेड यांनी वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन प्रसिध्द करणेबाबत दि.१९/०७/ २०२४ रोजी दिलेल्या पत्रावरून याद्वारे नोटीस देण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंदणी सुधारणा कायदा २०२३ नुसार अर्जदार यांनी **रुबाबबी मुस्तफा शेख यांचा मृत्यु मौजे धानोरा ता जामखेड** यांचे राहते घरी दिनांक ०२ नोव्हेंबर २०१९ रोजी झालेला आहे. परंतु त्यांचे मृत्युची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९७६ नुसार ग्रा.पं. धानोरा वंजार वाडी ता. जामखेड जि. अहमदनगर येथे झालेली नाही. सदर नोंद घेणे बाबत अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे.परंतु त्यांचे मृत्युची नोंद जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९७६ नुसार ग्रा.पं. धानोरा वंजार वाडी ता. जामखेड जि. अहमदनगर येथे झालेली नाही. सदर नोंद घेणे बाबत अर्जदाराने अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी मयत नामे रुबाबबी मुस्तफा शेख यांचे मृत्युचे नोंद घेणेबाबत कोणाचाही आक्षेप किंवा काही म्हणणे असल्यास त्यांनी सदरनोटीस प्रसिध्दीचे दिनांकापासून एक महिन्याचे आत आपल्या लेखी हरकत कागदपत्राच्या पुराव्यानिशी मा. तहसिलदार सो. जामखेड यांचे कडे लागलीच सादर करावे. अन्यथा अर्जदाराचा पुरावा घेवुन सदर अर्जदाराचा अर्जावर योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**दिनांक १९/०७/२०२४**
**स्थळ जामखेड**

**ॲड.व्ही.एम.देशमुख**
अहमदनगर

# नाकाबंदीत जप्त केलेली 'ती' पाच कोटींची रक्कम प्राप्तीकर विभागाकडे जमा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** खेड शिवापूर टोलनाका परिसरात नाकाबंदीत जप्त केलेली पाच कोटी रुपयांची रक्कम प्राप्तीकर विभागाकडे जमा केली आहे. पंचासमक्ष रोकड मोजण्यात आली आहे. निवडणूक आयोग, प्राप्तीकर विभाग, पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास केला जाणार आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी दिली.

मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर खेड शिवापूर टोलनाक्याजवळसोमवारीसायंकाळी ग्रामीण पोलिसांनी नाकाबंदीत मोटारीची तपासणी केली. तेव्हा मोटारीत मोठ्या प्रमाणावर रोकड आढळून आली. त्यानंतर पोलिसांनी मोटारचालकासह चौघांची चौकशी सुरू केली, तसेच रोकड जप्त केली. पंचासमक्ष रोकड मोजण्यात आली. राजगड पोलीस ठाण्यात वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पोलिसानी जप्त केलेली रोकड पाच कोटी रुपये असल्याचे मोजणीत उघड झाले.



ही रक्कम एका बांधकाम ठेकेदाराची असल्याची माहिती त्यांनी दिली. याबाबतची माहिती ल निवडणूक आयोगाकडे देण्यात आली आहे. जप्त केलेली पाच कोटींची रक्कम प्राप्तीकर विभागाकडे देण्यात येणार आहे. मोटारचालकासह चौघांची चौकशी करण्यात येत आहे. निवडणूक आयोग आणि प्राप्तीकर विभागाच्या सूचनेनुसार पुढील कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस अधीक्षक देशमुख यांनी नमूद केले.

मोटारीतून पाच कोटी रुपये जप्त करण्यात आल्यानंतर या घटनेची नोंद पोलिसांनी (स्टेशन डायरीत) केली आहे. मोटारीतून सागर पाटील, रफीक नदाफ, बाळासाहेब आसबे, शशिकांत कोळी (रा. सांगोला) प्रवास करत होते, अशी नोंद करण्यात आली आहे. चौकशी करण्यात आलेला एक जण सांगोल्यातील एका राजकीय नेत्यांशी संबंधित असल्याची चर्चा सुरू आहे. चौकशीनंतर चौघांना सोडले मोटारीतून पाच कोटी रुपयांची रोकड जप्त केल्यानंतर चालकासह चौघांची चौकशी करण्यात आली. चौकशीनंतर त्यांना सोडून देण्यात आले असून, जप्त केलेली रोकड प्राप्तीकर विभागाकडे जमा करण्यात आली आहे. संबधित मोटार संदीप नलावडे यांच्या मालकीची आहे. मात्र, मोटारीची विक्री बाळासाहेब आसबे यांना करण्यात आली, असा दावा चौकशीत करण्यात आला आहे.

द•ख•ल

## आर्थिक फसवणूकीतुन व्यापाऱ्याची आत्महत्या, सातजणांविरुद्ध गुन्हा

**पुणे :** आर्थिक फसवणुकीमुळे व्यापाऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना भवानी पेठ परिसरात घडली. याप्रकरणी खडक पोलिसांनी सातजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.रमजान अली साचे (वय ४४, रा. भवानी पेठ) हे आत्महत्या केलेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे. याबाबत रमजान यांच्या पत्नीने खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सुनील बेले, अफसर शेख, मतीन शेख, हैदर शेख, असिफ, मुजम्मिल पटवेकर, संजीव बजारमठ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, साचे यांचा कपड्यांचा व्यवसाय होता. त्यांची पत्नी एका शाळेत शिक्षिका आहे. रमजान यांना गुंतवणुकीवर परतावा देण्याचे आमिष दाखवून आरोपींनी त्यांच्याकडून ५० लाख रुपये उकळले. त्यासाठी त्यांनी बँकेचे कर्जही घेतले होते. आर्थिक अडचणीमुळे त्यांनी पैसे परत मागितले. तेव्हा आरोपींनी त्यांना नकार दिला. आरोपींनी त्यांना त्रास दिल्याने त्यांनी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली.

## उत्रोलीत चिमुकल्यांनी केली मतदान जनजागृती



**भोर :** विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी शाळा , महाविद्यालय ,सामाजिक संघटना, विविध मंडळाच्या वतीने विविध उपक्रम राबवले जात आहेत.उत्रोली (ता.भोर)येथे अंगणवाडी केंद्र क्र.२ वतीने मतदान जनजागृती फेरीचे आयोजन करण्यात आले. अंगणवाडी सेविका मीना शिवतरे ,वंदना शिवतरे, पालक संतोष कदम यांचे मार्गदर्शनाखाली विशाखा शेंडगे,पूजा शिवतरे, धनश्री सुतार ,सविता ननावरे,करिष्मा सुतार,चांगुणाबाई शिवतरे यांच्या उपस्थितीत अंगणवाडी परिसरात मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली. आगामी दिवाळी सणाच्या औचित्ताने अंगणवाडी केंद्रात आकाश कंदील बनवणे कार्यशाळा घेण्यात आली.संतोष कदम यांनी मार्गदर्शन केले. अंगणवाडी केंद्रातील मुलांना वाढदिवसानिमित्त विविध वनौषधी झाडांच्या रोपांचे वाटप करण्यात आले.

## भुलेश्वर प्रासादिक वारकरी दिंडीच्यावतीने मुलांना दीपावलीनिमित्त फराळ वाटप



**माळशिरस :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील माळशिरस येथील श्री भुलेश्वर प्रासादिक वारकरी दिंडिच्या वतीने प्राजक्ता मतिमंद मुलांची निवाशि शाळा सुपे ता बारामती येथे दिपावली सणाच्या निमित्ताने फराळ वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.भुलेश्वर प्रसादिक दिंडी गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक, शैक्षणिक, स्वरूपाचे उपक्रम राबवित आहे. त्यामध्ये वृक्षारोपण ,स्वच्छता मोहिम, शालेय वह्या व पुस्तके वाटप, दीपावलीनिमित्त फराळ वाटप तसेच वयोवृद्ध लोकांसाठी आरोग्य शिबिरे घेण्यात येतात. भुलेश्वर प्रसादिक दिंडीचे अध्यक्ष ह.भ. प. लक्ष्मण महाराज यादव यांनी अशी माहिती दिली . माळशिरस, पोंढे ,टेकवडी, पिसवे तसेच पंचक्रोशीतील वारकरी , भजनी मंडळ, विनेकरी, चोपदार यांच्या वतीने ही मुलांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या . या कार्यक्रमासाठी भुलेश्वर प्रसादिक दिंडीचे वारकरी पोपटअण्णा वाघले , भरत बापू यादव, प्रकाश यादव, दिलीप निवृत्ती यादव, श्री भुलेश्वर विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक विश्वास चव्हाण तसेच प्राजक्ता मतिमंद मुलांची निवाशि शाळा सुपे ता बारामती येथील संस्थापक अध्यक्ष तसेच शिक्षक व शिक्षिका आणि मुले यावेळी उपस्थित होते.

## रक्तदान शिबिरात ५० जणांचे रक्तदान

**झरेकाठी :** आश्वी बुद्रूक येथीन उडान टीमने अयोजजित केलेल्या रक्तदान शिबिरात पन्नास रक्तदात्यांनी रक्तदान केले. संतउपाध्या प्रवीणऋषी महाराज यांच्या आशीर्वादाने तीर्थषरुषी महाराज यांच्या संकल्पनेतून सुरु झालेल्या उडान टीम आश्वीची कन्या साध्वी मोक्षदा महाराज यांच्या प्रेरणेने रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, गोरक्षणसह विविध धार्मिक, सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रवरा ग्रामीण रुग्णालयाच्या रक्तपेढी सहकार्य केलेले हे शिबिर आश्वी बुद्रूक जिल्हा परिषद मुलींचा शाळेच्या प्रांगणात झाले. शिबीराचे उद्घाटन सरपंच नामदेव शिंदे, जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुमतीलाल गांधी, रामचंद्र भंडारी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाळिग्राम चंद, पंडितराव म्हसे, बाबुराव जऱ्हाड, देवराम डोखे, भिकाजी ताजणे, सीताराम बलमे, पांडुरंग लामखडे, अर्जुन सांगळे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी सलोनी पटवा, महिमा रातडीया, कोमल बोरा, प्रसन्ना रातडीया, जिनेशा गांधी, दिया गांधी, अमिता भंडारी, स्वराली पटवा, भूषण भंडारी, ॲड. सनी भंडारी, प्रीत गांधी, अनिकेत पटवा, रितेश भंडारी, अथर्व रातडीया, रोशन रातडीया, शुभ बोरा, यश भंडारी, प्रेम गांधी यांच्यासह उडान टीमचे सदस्य उपस्थित होते.

## राज्यात अनेक भागांना पावसाचा फटका

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**संभाजीनगर :** राज्यामध्ये मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, कोकण विभागात गेल्या एक ते दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत असल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले. कोकणामध्ये हवामान बिघडल्यामुळे मच्छिमारी थांबली असून मच्छिमारांना आर्थिक फटका बसला आहे. पश्चिम महाराष्ट्रालाही गेल्याच आठवड्यात मुसळधार पावसाने झोडपल्याने तिथेही भात आणि सोयाबीनचे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसाने शनिवारी रात्री मराठवाड्यातील ४७ महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. पावसामुळे अनेक भागांतील पिके पाण्याखाली गेली. नाशिक जिल्ह्यात झालेल्या पावसामुळे जायकवाडी धरण पुन्हा एकदा १०० टक्के भरले असून १८ दरवाजांतून ७३३६ क्युसेक वेगाने गोदावरी नदीपात्रात विसर्ग करण्यात आला. त्यामुळे अनेक भागांतील शेतात पाणी साचल्याने जोमात आलेले पीक पाण्याखाली गेले आहे. शनिवारी रात्री उशिरापर्यंत पाऊस पडल्याने काढलेले सोयाबीन, मका या पिकांचे नुकसान होण्याचीही शक्यता आहे. तसेच कापसाचा रंगही बदलू शकतो. दोन दिवसांच्या सततच्या पावसाने नुकसानीची व्याप्ती लगेच कळणार नाही. पण नुकसान दिसू लागले असल्याचे कृषी उपसंचालक तुकाराम मोटे यांनी सांगितले. खुलताबाद तालुक्यातील कौटगाव, संजरपूरवाडी, भोकरदन तालुक्यातील वाढोना, गोद्री, परळी वैजनाथ तालुक्यातील सेलू या गावात वीज पडून जनावरे दगावली. काही ठिकाणी भिंत पडल्याने जनावरे जखमी झाल्याचेही वृत्त आहे.

## पोलीस असल्याच्या बतावणीने ज्येष्ठ नागरिकांची ७० लाखांची फसवणूक

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** कारवाईची भीती दाखवून फसवणूक करण्याचे प्रमाण वाढीस लागली आहेत. पोलीस असल्याची बतावणी करुन सायबर चोरट्यांनी वेगवेगळ्या घटनेत दोन ज्येष्ठ नागरिकांच्या बँक खात्यातून ७० लाख रुपये ऑनलाइन पद्धतीने चोरून नेल्याचे उघडकीस आले.

याबाबत एका ज्येष्ठ नागरिकाने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार पाषाण भागात राहायला आहेत. सायबर चोरट्यांनी सप्टेंबर महिन्यात त्यांना समाज माध्यमातून संदेश पाठविला होता. चोरट्याने त्यांच्याकडे पोलीस असल्याची बतावणी केली होती. चोरट्यांनी त्यांना पोलीस दलातील बनावट ओळखपत्र पाठविले. तुमच्या बँक खात्यातून काळ्या पैशांचे व्यवहार झाले आहेत. याप्रकरणी कारवाई करण्यात येणार आहे. गुन्हा दाखल न करणे, तसेच तपासात मदत करण्याासाठी चोरट्याने तातडीने पैसे जमा करावे लागतील, अशी बतावणी केली. चोरट्याने त्यांच्या बँक खात्याची माहिती घेतली. या माहितीचा गैरवापर करुन चोरट्याने खात्यातून ४५ लाख रुपये चोरून नेले. दुसऱ्या एका घटनेत टिळक रस्ता भागातील एका ८४ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची चोरट्यांनी फसवणूक केली आहे. चोरट्यांनी त्यांच्या मोबाइल क्रमांकावर संपर्क साधला होता. त्यांच्या बँक खात्याची माहिती घेऊन चोरट्यांनी २५ लाख ४० हजार रुपये चोरले. चोरट्याने वेगवेगळ्या बँक खात्यात चोरलेली रक्कम हस्तांतरित केली आहे. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोरे तपास करत आहेत. शहरात गेल्या काही महिन्यांपासून कारवाईची भीती दाखवून फसवणूक करण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. चोरट्यांनी बतावणी करुन नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली आहे.

## पहिल्याचदिवशी विधमान आमदारांसह इच्छुकांची उमेदवारी अर्जासाठी गर्दी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पिपंरी :** विधानसभा निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध झाल्यानंतर पहिल्याच दिवशी पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि मावळ मतदारसंघातून विद्यमान आमदारांसह प्रमुख पक्षातील इच्छुकांनी अर्ज नेले आहेत. चारही मतदारसंघातून ६२ जणांनी १३४ अर्ज घेतले आहेत. मात्र, कोणीही उमेदवारी अर्ज दाखल केलेला नाही. निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर रोजी विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार निवडणुकीची अधिसूचना (२२ ऑक्टोबर) रोजी प्रसिद्ध झाली. मंगळवारपासून उमेदवारी अर्ज स्वीकारण्यास प्रारंभ झाला आहे. प्रत्येक मतदारसंघात निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करताना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या शंभर मीटर परिसरात उमेदवारांच्या फक्त तीन वाहनांना प्रवेश आहे. उमेदवारी अर्ज दाखल करताना देखील उमेदवारासह फक्त पाच जणांना प्रवेश आहे. या परिसरात मिरवणूक, सभा घेण्यास तसेच कोणत्याही प्रकारची घोषणा, वाद्ये वाजविण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे.

## राहुल गांधी यांच्या हजेरीसाठी समन्स

## स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी अवमानकारक वक्तव्य

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी अवमानकारक वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांना पुण्यातील विशेष न्यायालयाने बजावलेले समन्स दिल्लीतील पतियाळा न्यायालया मार्फत बजावण्यात येणार आहे. याबाबत पतियाळा न्यायालयाने पुण्यातील विशेष न्यायालयाला सूचना केली आहे.

सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधीं यांच्याविरुद्ध पुण्यातील न्यायालयात मानहानीचा दावा दाखल केला आहे. या प्रकरणी राहुल गांधी यांना विशेष न्यायालयाने समन्स बजावले होते. त्यानुसार २३ ऑक्टोबरला स्वतः किंवा वकीलांमार्फत न्यायालयात हजर राहून बाजू मांडण्याचे आदेश देण्यात आले होते. हे समन्स दिल्लीतील पतियाळा न्यायालयाकडे पाठविण्यात आले होते. त्यावर पतियाळा न्यायालयाने संबंधित समन्स मुख्य न्यायदंडाधिकारी पतियाळा न्यायालया मार्फत बजावण्यात यावे, अशी सूचना केली आहे, अशी माहिती सात्यकी सावरकर यांचे वकील ड. संग्राम कोल्हटकर यांनी दिली.

या दाव्याची सुनावणी आता आजी-माजी खासदार-आमदार यांच्याविरुद्ध खटले चालविणाऱ्या विशेष न्यायालयात होणार आहे. त्यासाठी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांच्या या विशेष न्यायालयाने राहुल गांधी यांना हजर होण्याचे समन्स बजावले होते. राहुल गांधी यांनी लंडनमध्ये अनिवासी भारतीयांसमोर केलेल्या भाषणात सावरकरांविषयी अवमानकारक वक्तव्य केले होते. त्याचा दाखला देत सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधींविरोधात न्यायालयात धाव घेतली आहे. या प्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी तपासणी अहवाल सादर केला असून, त्यात राहुल गांधी यांच्या आक्षेपार्ह वक्तव्याबाबत सावरकरांच्या तक्रारीत तथ्य आढळले होते.

## निवडणुकीच्या तोंडावर शहरात टोळक्यांकडून दहशत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** निवडणुकीच्या तोंडावर शहरात टोळक्याकडून दहशत माजविण्यच्या घटना वाढीस लागल्या आहेत. टोळक्याने केलेल्या हल्ल्यात तिघे जखमी झाले असून, याप्रकरणी वारजे, पर्वती, चंदननगर पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले.

सिंहगड रस्त्यावरील पानमळा परिसरात दुचाकी आडवी घातल्याच्या कारणावरुन टोळक्याने एका तरुणावर कोयत्याने वार केली. टोळक्याने केलेल्या हल्ल्यात दोन तरुण जखमी झाले. याप्रकरणी आकाश म्हस्के, गणेश रेणुसे, तेजस नायर, रोहित खडके, भैय्या पालवे, मयूर पालखे, प्रथमेश रेणुसे, अजय घाडगे यांच्यासह एका साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत समीर आत्माराम महादे (वय ३२, रा. सिद्धार्थ शोरुमजवळ, सिंहगड रस्ता) याने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



दुचाकी आडवी घालण्यावरुन आरोपी आणि फिर्यादी म्हस्के यांच्या मित्रांमध्ये वाद झाला होता. मंगळवारी सायंकाळी सहाच्या सुमारास महादे, त्याचे मित्र रिची म्हस्के, आकाश सूर्यवंशी, मीर खोचाडे, यश डोळे, अजित थोरात, अथर्व रणदिवे आरोपींनी समजावून सांगण्यासाठी गेले होते. त्या वेळी महादेचा मावसभाऊ संतोष साळुंके याने आरोपींना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. आरोपी तेजस नायरने त्याच्याकडील कोयत्याने साळुंके याच्या डोक्यात कोयत्याने वार केला. महादे आणि रिची म्हस्के यांना दगड फेकून मारला. आरोपींनी दहशत माजविल्याने परिसरात घबराट उडाली. सहायक पोलीस निरीक्षक नामदे तपास करत आहेत.

चंदननगर भागात वैमनस्यातून तरुणाला दांडके आणि गजाने बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. अमित दिलीप आरणे (वय ३५, रा. निलेश आंगण सोसायटी, आनंद पार्क, वडगाव शेरी) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी कैलास शंकरलाल भाटी (वय २४), सोहनराम अस्लाराम प्रजापती (वय २८), दीपककुमार दलाराम प्रजापती (वय २०), विक्रम नगाराम प्रजापती (वय १९), चंदन केशराम मेघवाल (वय २०), सुखदेव पूनराम मेघवाल (वय २२, सर्व रा. वडगाव शेरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आरणेने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

रविवारी रात्री वडगाव शेरीतील मद्य विक्री दुकानात आरणे गेला होता. त्या वेळी वैमनस्यातून आरोपींनी आरणेला शिवीगाळ करुन दांडके आणि गजाने बेदम मारहाण केली. सहायक पोलीस निरीक्षक माने तपास करत आहेत.

## राहुरी नगरपालिकेची औषध फवारणी करून जनजागृती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** मलेरिया, चिकनगुन्या व डेंग्यु या सारख्या साथीच्या आजारांचे प्रतिबंध व उपाय करण्यासाठी राहुरी नगरपरिषद कडून नगरपरिषद हद्दीत औषध फवारणी व नागरिकांध्ये जन जागृती करण्यात येत आहे.

नागरिकांनी निकामी टायर्स, फुटक्या बाटल्या, फुटक्या करवंट्या, फुटके प्लास्टिक, ड्रम्स, माठ आदि वस्तूंची योग्य विल्हेवाट लावून आपले घर व परिसर स्वच्छ ठेवावा. पंक्चर काढण्याच्या दुकानातील टायर्स मधील साठलेले पाणि टायर्सला छिद्र पाडून काढून टाकावे. निकामी टायर फेकून न देता त्यांची योग्य विल्हेवाट लावावी. घराची दारे व खिडक्यांना जाळ्या बसवून घ्याव्यात. झोपताना मच्छर दाणीचा वापर करावा. डास प्रतिबंधक क्रिम, अगरबत्तीचा वापर करावा. झोपताना अंगभर कपडे घालून झोपावे.

थंडी वाजून ताप येणे, उलटी होणे, डोकेदुखी, सांधेदुखी, कंबरेखालील भाग गळून जाणे, अशी लक्षणे दिसून आल्यास ताबडतोब नजीकच्या ग्रामीण रुग्णालयात मोफत औषधोपचार घ्यावा. असे रुग्ण आढळल्यास नजीकच्या ग्रामीण रुग्णालय केंद्रास तातडीने कळवावे. असे आवाहन राहुरी नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

डासांचे करु निर्मूलन, होऊ रोगमुक्त सर्वजण. कोरडा दिवस पाळू डेंग्यु आजार टाळू असे आवाहन राहुरी नगर प्रशासनाच्या वतीने व आरोग्य विभागाच्या वतीने नागरिकांना करण्यात आले आहे.

# मुजोर वाळु माफियांचा हौदोस; गुनाट येथील शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**राजकीय पदाधिकारी गप्प का...?**

शिरुरच्या पुर्व भागात निमोणे येथील कुऱ्हाडवाडी तसेच गुनाट येथील कोळपेवस्ती तसेच चिंचणी येथील घोड धरणाच्या परिसरातून सर्रास बेकायदेशीरपणे वाळू उपसा तसेच वाळू वाहतुक चालु असताना या गावांतील सरपंच, ग्रामसेवक, तलाठी नक्की काय करतात हा मोठा यक्षप्रश्न आहे. तसेच महसूल विभाग, पोलिस तसेच वाळू माफियांशी संगनमत करत याच राजकीय पुढाऱ्यांनी त्यांना वाळू उपशासाठी या भागात आणले असल्याचीही दबक्या आवाजात जोरदार चर्चा सुरु असुन घोड धरणातील बेकायदेशीर वाळू उपशासाठी दहशत निर्माण करणारे वाळू माफिया घोड धरणातील 'काळ सोनं' मिळविण्यासाठी शेतकरी व सर्वसामान्य लोकांच्या जीवावर उठतात की काय...? अशी सध्या परिस्थिती निर्माण झाली आहे.

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**न्हावरे :** शिरुरच्या पुर्व भागातील घोड धरणात गेल्या तीन महिन्यांपासुन प्रचंड मोठया प्रमाणात यांत्रिक बोटींच्या साह्याने बेसुमार वाळू उपसा चालु असुन याबाबत व्हिडीओ करुन तो सोशल मिडियावर व्हायरल केल्याचा राग आल्याने वाळू माफियांनी गुनाट



येथील शेतकरी भिवसेन कोळपे यांना फोनवर धमकी देत त्यांच्या शेतीतील मोटारीसह, बोअरवेल व केबलची तोडफोड करत लाखों रुपयांचे नुकसान केले आहे. त्यामुळे शेतकरी भयभीत झाले असुन या मुजोर वाळु माफीयांवर महसुल व पोलिस विभाग आता कारवाईचा बडगा उगारणार का...? अशी सगळीकडे दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे.

गुनाट (ता. शिरुर) येथील शेतकरी भिवसेन कोळपे यांनी काही दिवसांपुर्वी गुनाट येथील कोळपेवस्ती येथे घोड धरणातुन बेकायदेशीररीत्या वाळू उपसा होत असल्याबाबत व्हिडिओ करुन तो सोशल मिडीयावर व्हायरल केला होता. याचाच राग मनात धरुन मुजोर झालेल्या वाळू माफियांनी कोळपे यांना फोन करुन 'वाळू माफियांच्या नादाला लागू नकोस' अशी धमकी देत शनिवार (ता १९) रोजी २४३, १५८, १६३ या तीनही गटातील दहा अश्वशक्तीचे दोन विद्युत पंप नदीपात्रात टाकून दिले. तर शेतातील बोअरवेल आणि शेतातील पाइपलाइनची मोडतोड केली.

घोड धरणातील वाळूमाफियांकडून शेतमालाच्या होणाऱ्या नुकसानीबाबत संबंधित यांनी पोलिस व महसुल प्रशासनाकडे सातत्याने दाद मागत असल्यानेच हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. याबाबत भीवसेन कोळपे (रा. गुनाट, ता. शिरुर) या शेतकऱ्याने शिरुर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

घोड धरणातील वाळू माफियांनी वाळू वाहतुकीसाठी आमच्याच शेतातून रस्ते करायचे, त्यामुळे होणारे नुकसानही आम्हीच सहन करायचे असा सध्या प्रकार सुरु असुन वाळुमाफियांमुळे आम्हाला 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' सहन करावा लागत आहे. माझ्या शेती साहित्याचे नुकसान केले, त्या रात्री त्या परिसरात कोणाकोणाचे मोबाईल कार्यान्वित होते. कोण कोणाच्या संपर्कात होते, हे तपासल्यास खरे गुन्हेगार सापडतील.

**भिवसेन कोळपे**
**नुकसानग्रस्त शेतकरी**

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री






## टायर फुटल्याने आग लागून खासगी बस भस्मसात

### सुदैवाने जीवितहानी नाही, टोलनाकाही जळाला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : अहिल्यानगर-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरक नेवासा हद्दीतील खडका टोलनाका येथे साईराम ट्रॅव्हल्स कंपनीच्या प्रवासी बसचा टायर फुटल्याने ही खासगी बस जळून खाक झाल्याची घटना घडली. बसमध्ये बसलेल्या सुमारे १५ प्रवाशांनी टोल कर्मचाऱ्यांच्या मदतीने सावधानता बाळगत उतरून घेतल्याने मोठी जीवितहानी टळली. सदरची घटना बुधवारी पहाटे पाचच्या सुमारास घडली. आगाती खडका येथील टोलनाकाही जळून खाक झाले आहे.



**नेवासा :** तालुक्यातील अहिल्यानगर-संभाजीनगर महामार्गावर बसला लागलेली आग विझवताना अग्निशमन दलाचे पथक. (छाया : सुधीर चव्हाण नेवासा)

या घटनेची पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, पुणे येथून जामोदकडे जाण्यासाठी साईराम कंपनीची बस (एम. एच-१९-वाय-३१२३) पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास खडकाफाटा येथील टोलनाक्यावर आली. तेथेच या बसचे टायर फुटले व बसने पेट घेतला. या बसमध्ये बसलेल्या सुमारे पंधरा प्रवाशांनी प्रसंगावधान दाखवून बसमधून उतरून घेतले. टायर फुटून बसने पेट घेतल्याचे लक्षात येताच चालकाने पलायन केले. बसमध्ये एकूण तीस ते पस्तीस प्रवाशी होते. या बसने अगोदर घोडेगाव जवळील जिओ कंपनीच्या जवळील पेट्रोल पंपावर पेट घेतला. यावेळी बसमध्ये बसलेल्या अंदाजे वीस महिलांना उतरवून इतर बसमध्ये बसविण्यात आले. पेटलेली बस विझवल्यानंतर पुन्हा बस संभाजीनगरकडे जाण्यासाठी निघाली, असे बसमध्ये प्रवास करत असलेल्या एका प्रवाशाने सांगितलेही बस खडका टोल नाक्यावर आल्यावर गाडीचे टायर फुटून पुन्हा बसने पेट घेतला. लाईनर जाम झाल्याने टायर फुटले व बसने पेट घेतला, अशी माहिती मिळाली. बसमध्ये बसलेल्या प्रवाशांनी वेळीच उतरून घेतल्याने जीवितहानी टळली. पोलीस स्टेशनला कळवल्यानंतर पोलीस निरीक्षक धनंजय जाधव हे फौजफाटयासह घटनास्थळी दाखल झाले. यावेळी टोलनाक्यावरील कर्मचाऱ्यांनी अग्निशमन दलाला बोलावले. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत गाडी पूर्ण जळून खाक झाली होती.टोलनाक्याच्या बूथजवळच बसने पेट घेतल्याने बूथसह वायरिंगचेही मोठे नुकसान झाले असल्याचे टोलनाका व्यवस्थापक विलास देसले यांनी सांगितले. एक ते दोन तासांच्या प्रयत्नाने आग आटोक्यात येईपर्यंत संभाजीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांची मोठी रांग लागल्याने विस्कळीत झाली होती.

### दोघींची छेड काढल्याने...

## आर्मीतील तरुणांना जमावाकडून चोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : मुलींची छेडछाड करणाऱ्या दोन टवाळखोर तरुणांची यथेच्छ धुलाई करून त्यांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. विशेष म्हणजे तरुणीची छेड काढणारा एक तरुण आर्मीत आहे तर दुसरा आर्मीत जाण्याच्या तयारीत आहे.

राहुरी शहरातील तीन कॉलेज तरुणी काल दिनांक २३ ऑक्टो रोजी सकाळी कॉलेजला गेल्या होत्या दुपारी अडिच वाजे दरम्यान त्या कॉलेजच्या मधल्या रोडने राहुरीकडे येत होत्या. तेव्हा एका हॉटेल समोर मोटारसायकलवर दोन तरुणांनी त्या कॉलेज तरुणींचा पाठलाग करून अश्लील हातवारे केले. त्यावेळी कॉलेज तरुणींनी त्या दोन तरुणांना शिवीगाळ करुन अश्लील हातवारे केल्याचा जाब विचारला. तेव्हा त्या तरुणांनी सदर कॉलेज तरुणींच्या अंगावर धावून जात त्यांचा हात धरुन दमदाटी केली. त्यावेळी कॉलेज तरुणींनी आरडाओरडा केला. तेव्हा रस्त्याने जात असलेल्या सुमारे १५ ते २० कॉलेज तरुणांनी त्या दोन टवाळखोर तरुणांची यथेच्छ धुलाई केली. आणि त्यांना राहुरी पोलिस ठाण्यात आणून पोलिसांच्या स्वाधीन केले. यावेळी कॉलेज



तरुणींच्या पालकांनी व नातेवाईकांनी पोलिस ठाण्याच्या आवारात प्रचंड गर्दी केली होती. या घटने बाबत दुपारी उशिरापर्यंत पोलिस कारवाईचे काम सुरु होते. सदर दोन टवाळखोर तरुण हे राहुरी तालुक्यातील असून एक आर्मीमध्ये नोकरी करत आहे. तर दुसर्या तरुणाचा पुढील आठवड्यात आर्मी भरतीचा पेपर असल्याची माहिती समोर येत आहे. राहुरी कॉलेज व शहरात असलेल्या शाळा परिसरात शाळा सुटल्यावर व शाळा भरते वेळी अनेक टवाळखोर तरुण मोटारसायकल चकरा मारत असतात. तसेच मुलींचे छेडछाड करण्याचे प्रकार वाढले आहेत. सदर टवाळखोर तरुणांचा पोलिस प्रशासनाने बंदोबस्त करावा. अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

## अजामीन पात्र वॉरंटमधील तीन आरोपींना अटक



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील एन बी ए वॉरंट मधील तीन मुख्य आरोपीना राहुरी पोलिसांनी अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

यात आरोपी भिकाजी रंगनाथ बर्डे रा. म्हैसगाव ता. राहुरी यास रजिस्टर नंबर २३/२०१६ राहुल पोलिसात गुन्हा दाखल होता न्यायालयाच्या आदेशानुसार त्याचा शोध घेऊन त्याला अटक करण्यात आली आहे. आरोपी नंबर दोन अण्णा योहान विधाते (वय ५८ वर्षे) रा. वरशिंदे तालुका राहुरी व आरोपी नंबर तीन सिद्धार्थ अण्णा विधाते वय२४ राहणार वर शिंदे तालुका राहुरी यांच्या विरोधात राहुरी पोलिसात गुन्हा रजिस्टर नंबर २६२/२०२१ अन्वये दाखल होता परंतु न्यायालयाच्या आदेशाने त्या आरोपींचा राहुरी पोलिसांनी शोध घेऊन त्यांना अटक करण्यात आली आहे.

या पथकात पोलीस हवालदार जानकीराम खेमनर पोलीस नाईक रामनाथ सानप पोलीस नाईक प्रवीण अहिरे पोलीस अंमलदार लक्ष्मण खेडकर यांचा समावेश असून जामीन पात्र गुन्ह्यातील या तिन्ही आरोपींना राहुरी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्या तीनही आरोपींना १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. तसेच राहुरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर ११२४/२०२४ कायदा कलम ३०३,(२)३(५) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी भीमाशंकर भगवान बोर्डे वय ३२ वर्ष राहणार डिग्रस तालुका राहुरी याचा शोध घेऊन पोलीस नाईक गणेश सानप पोलीस अंमलदार अंबादास गीते यांनी शोध घेऊन त्यास अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीस राहुरी न्यायालयाने सुनावली एक दिवस पोलीस कस्टडी सुनावली आहे.राहुरीचे पोलीस निरीक्षक यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की न्यायालयीन समन्स प्राप्त होताच वेळेवर न्यायालयात हजर राहून बी डब्ल्यू अथवा एनबीडब्ल्यू वॉरंट निघणार नाही याची काळजी घ्यावी. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला , अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबरमे उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे साहेब यांच्या सूचनेनुसार राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई/फडोळ, पोलीस उपनिरीक्षक धर्मराज पाटील पोलीस हवालदार जानकीराम खेमनर पोलीस नाईक रामनाथ सानप पोलीस नाईक प्रवीण अहिरे पोलीस नाईक गणेश सानप लक्ष्मण खेडकर पोलीस अंमलदार अंबादास गीते यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे

## दूधगंगा अपहार प्रकरणील आरोपी भाऊसाहेब कुटेंची दिवाळी कारागृहातच

### न्यायालयाने आरोपीचा जामीन फेटाळला, निर्णयाचे ठेवीदारांकडून स्वागत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** दूधगंगा नागरी सहकारी पतसंस्थेच्या सुमारे ८१ कोटी रुपयांच्या अपहार प्रकरणी गेल्या अनेक दिवसांपासून जामीन मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या मुख्य आरोपी भाऊसाहेब कुटे याच्या जामीन अर्जावर मंगळवारी संगमनेरच्या जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने निर्णय देत जामीन अर्ज फेटाळला. यामुळे कुटेंची दिवाळी आता कारागृहात साजरी होणार आहे. न्यायालयाच्या निर्णयावर ठेवीदारांनी समाधान व्यक्त केले आहे.

ऑगस्ट २०२३ मध्ये दूधगंगा नागरी सहकारी पतसंस्थेचा आर्थिक घोटाळा समोर आला. लेखा परीक्षकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सुमारे ८१ कोटी रुपयांच्या या घोटाळ्याच्या गुन्ह्यामध्ये मुख्य आरोपींत पतसंस्थेचा अध्यक्ष भाऊसाहेब दामोदर कुटे याच्यासह व्यवस्थापक भाऊसाहेब विठ्ठल गुंजाळ, चीफ अकाउंटंट भाऊसाहेब संतू गायकवाड, चेतन नागराज बाबा कपाटे उर्फ सुदर्शन महाराज (छत्रपती संभाजीनगर), दादासाहेब भाऊसाहेब कुटे, संदीप भाऊसाहेब कुटे, अमोल भाऊसाहेब कुटे, विमल भाऊसाहेब कुटे, शकुंतला भाऊसाहेब कुटे, अमोल कृषी सेवा केंद्र प्रोप्रायटर सोनाली दादासाहेब कुटे, अमोल ट्रेडिंग कंपनी प्रोप्रायटर दादासाहेब भाऊसाहेब कुटे, श्री डेव्हलपर्स संदीप भाऊसाहेब कुटे (सर्व संगमनेर), यांच्यासह कृष्णराव श्रीपतराव कदम, श्रीमती प्रमिला कृष्णराव कदम, अजित कृष्णराव कदम, सुजित कृष्णराव कदम (सर्व रा. देवळाली प्रवरा, ता. राहुरी) व संदीप दगडू जरे (रा. अहमदनगर) यांच्यासह त्यांना सहाय्य करणाऱ्या तत्कालीन लेखापरीक्षकांचा आरोपींमध्ये समावेश होता.

बँकेच्या व्यवस्थापकासह काही आरोपींना गुन्ह्याचा तपास करणारे तत्कालीन पोलीस निरीक्षक भगवान मथुरे यांनी अटक केली होती. त्यानंतर आर्थिक स्वरूपाचा गुन्हा असल्याने हा गुन्हा तपासासाठी आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. दरम्यानच्या काळात संगमनेरच्या जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाने बहुतांश आरोपींचे जामीन अर्जदेखील फेटाळून लावले होते. मात्र गुन्ह्याच्या तपासादरम्यान तपास यंत्रणा मुख्य आरोपी, त्याचे कुटुंबीय आणि अन्य काही बड्या आरोपींवर मेहरबान असल्याचे वारंवार आरोप झाले. उच्च न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळूनदेखील तपास यंत्रणा आरोपींना अटक करू शकली नाही. तसेच याबाबत नेमका काय तपास झाला याचीदेखील माहिती माध्यमांना आर्थिक गुन्हे शाखेकडून मिळू शकलेली नाही.

मुख्य आरोपी असलेल्या भाऊसाहेब कुटे याच्या कुटुंबीयांना थेट सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा मिळाल्यानंतर भाऊसाहेब कुटे पोलिसात हजर झाले. त्या वेळेपासून ते अटकेत आहेत. आपला या गुन्ह्यात संबंध नसून आपली जामीनावर मुक्तता करण्यात यावी, यासाठी आरोपीने संगमनेरच्या जिल्हा व सत्र न्यायालयात नियमित जामिनासाठी अर्ज केला होता. जिल्हा न्यायाधीश योगेश मनाठकर यांच्यासमोर या प्रकरणी सुनावणी सुरू होती. मुख्य आरोपी असलेल्या भाऊसाहेब कुटे याला जामीन देण्यास सहाय्यक सरकारी अभियोक्ता मच्छिंद्र गवते, ठेवीदारांच्यावतीने काम बघणाऱ्या ॲड. सीमा काळे-सातपुते यांनी जोरदार विरोध केला. बँकेच्या होणाऱ्या सर्वच व्यवहारांना अन्य कर्मचारी, अधिकाऱ्यांप्रमाणेच बँकेचे अध्यक्षदेखील तेवढेच जबाबदार असतात असा युक्तिवाद न्यायालयासमोर करण्यात आला. तर आरोपीच्या वकिलांनीदेखील आरोपीचा गुन्ह्यात सहभाग नसल्याचे सांगत जामिनावर मुक्त करण्याची मागणी केली होती.

न्यायाधीश मनाठकर यांनी याप्रकरणी संबंधित वकिलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आरोपी कुटेचा जामीन अर्ज फेटाळून लावला. जामीन अर्ज फेटाळला गेल्याने ठेवीदारांनी समाधान व्यक्त केले आहे. जामीन अर्ज फेटाळला गेल्याने कुटेला आता उच्च न्यायालयात जामिनासाठी जावे लागणार आहे.

## वाल्मिकी समाजाला कुठल्याच पक्षाने स्थान दिले नाही : बेग

### पक्षाने तिकीट न दिल्यास अपक्ष लढणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपुर** : तीन वर्षापासून राष्ट्रीय श्रीराम संघाच्या माध्यमातून हिंदुत्वाच्या मुद्दा घेऊन काम करत असून ,जिथे हिंदूंवर अन्याय झाला त्या ठिकाणी उभे राहण्याची भूमिका घेतली. आज पर्यंत महाराष्ट्र मध्ये कुठल्याच पक्षाने वाल्मिकी समाजाला विधानसभा किंवा लोकसभेमध्ये उमेदवारी दिली नाही, त्यामुळे यावेळी सर्व हिंदू समाजाच्या पाठिंबावर आपण निवडणूक लढवणार आहोत यासाठी कुठल्याही पक्षांनी उमेदवारी न दिल्यास अपक्ष उभे राहू असे मत राष्ट्रीय श्रीराम संघाचे संस्थापक अध्यक्ष सागर बेग यांनी व्यक्त केले.



शहरातील स्वयंवर मंगल कार्यालय येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते ,यावेळी आकाश बेग, अंकुश जेधे, प्रकाश म्हेत्रे,, समाज सेवक पत्रकार समीर माळवे, सुनील पाचोने,.कृष्णानंद महाराज,भाऊ वाघमारे, रवी जाधव ,रोहित यादव, लखन माखेजा आदि उपस्थित होते.महाराष्ट्रासह श्रीरामपुर राखीव विधानसभा मतदारसंघात आजपर्यंत वाल्मिकी समाजाला कोणत्याही पक्षाने उमेदवारी दिली नाही. मात्र आपण जात कुठलीही मानत नाही. आपण आज हिंदू समाजासाठी लढा उभारला आहे. जिल्ह्यासह श्रीरामपूर तालुक्यात लव्ह जिहादसारखे प्रश्न उद्भवत आहेत। त्यात अनेक लव्ह जिहादचे प्रकरणे उघडकीस आणले आहे. त्यासाठी आंदोलन मोर्चाचे हत्यारही उपासले असून आजही लव्ह जिहाद प्रकरणी न्याय मागत आहोत.हिंदूंचे अनेक प्रश्न आहेत. या मुद्द्यावर आजपर्यंत कुठलाही राजकीय व्यक्ती बोलायला तयार नाही. आज समाजाला एकत्रित करण्यासाठीच आपण उमेदवारी करणार आहे. राष्ट्रीय श्रीराम संघाने तीन वर्षात हिंदुत्ववादीच्या विविध मुद्द्यावर जवळपास आंदोलने केली. श्रीरामपूरसह इतर तालुक्यात श्रीराम संघाच्या ३० शाखा आहेत. मला उमेदवारीसाठी कोल्हापूर येथील राजेंचे वंशज संभाजी राजे व संघर्ष योद्धा मनोज जरागे पाटील यांच्या निकटवर्तीयांनी संपर्क साधला आहे. याचबरोबर शिवसेना शिंदे गट यांची उमेदवारी मिळवण्यासाठी अनेकांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना संपर्क केला आहे. जरी आपल्याला पक्षाकडून उमेदवारी मिळाली नाही तरीही आपण हिंदूसाठी अपक्ष उमेदवारी करणार आहे.माझ्या या निवडणुकीसाठी सर्व स्तरातील हिंदुत्वादी, याचबरोबर साधुसंताचे आशीर्वाद माझ्या प्रचारासाठी नामांकित साधुसंत, वारकरी समाज, महिला भगिनी याचबरोबर तरुणवर्ग माझ्या प्रचारासाठी इच्छुक असून ते स्वयंपूर्तीने प्रचार करणार आहे . कार्यकर्त्यांनी मला तालुक्यातील अनेक गावांमध्ये एक मुखाने साथ देण्याचे ठरवले असून या सगळ्या गोष्टीची उत्सुकता पाहता माझ्यामध्येही आत्मविश्वास वाढला असून या निवडणुकीत हिंदुत्वादाची ताकद नक्कीच दाखवून देईल असल्याचे बेग यांनी सांगितले आहे.

## तलाठी कार्यालयाचे स्टिल चोरणाऱ्यांना अटक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यातील डिग्रस येथील तलाठी कार्यालयाचे सुरू असलेल्या बांधकामाचे लोखंडी गज- स्टील चोरी करणाऱ्या दोघांविरोधात राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून त्यांना पोलिसांनी तात्काळ गजाआड केले आहे.या संदर्भात समजलेली माहिती अशी की, देहरे येथील प्रताप भाऊसाहेब काळे (वय ३९) या ठेकेदाराने तलाठी कार्यालय बांधकामाचा ठेका घेतलेला असून तेथे बांधकाम सुरु आहे. चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर काळे यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, चार महिन्यांपासून तलाठी कार्यालयाचे बांधकाम सुरु आहे. २२ आक्टोंबरला दुपारी १२ वाजेच्यादरम्यान नगर बांधकाम चालू असलेल्या ठिकाणावरुन दोन इसम हे कॉलमसाठी बांधलेले लोखंडी गज चोरी करताना दिसले. आम्हाला पाहील्यावर ते पळुन गेले आहेत, असे आपणसा फोनवर सांगीतल्याने मी डिग्रस येथे बांधकामाचे ठिकाणी आलो. पाहणी केली असता असता त्या ठिकाणावरुन दोन कॉलमचे लोखंडी गज हे चोरीस गेलेले होते. आजूबाजूला त्या दोनजणांची विचारपुस केली असता त्यांची नावे संदीप अंबादास शिंदे, भीमाशंकर भगवान बोर्डे (दोन्ही रा. डिग्रस ता. राहुरी जि. अहिल्यानगर) असे असल्याचे समजले. फियादीवरून पोलिसांनी या दोघांना अटक केली आहे.

## भारत विरुद्ध न्यूझीलंड आज दुसरा कसोटी सामना

**पुणे** : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना उद्यापासून (दि. २४) पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर खेळवला जाणार आहे. पहिल्या कसोटीत भारताला पराभवाला सामोरे जावे लागते. पहिल्या कसोटीतील पहिल्या डावात भारतीय फलंदाजांनी सुमार कामगिरी केल्याने अवघ्या ४६ धावांत सर्व संघ बाद झाला होता. या उलट न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी खेळपट्टीचा चांगला उपयोग करत बलाढ्य भारतीय फलंदाजांना काबूत ठेवले होते. दुसरा कसोटी सामना कोणत्याही परिस्तितीत जिंकायचा या इराद्याने भारतीय संघ उद्या मैदानात उतरले. पुण्याची खेळपट्टी फिरकी गोलंदाजांना अनुकूल ठरेल अशी अपेक्षा असल्याने अष्टपैसू खेळाडू वॉशिंग्टन सुंदरची भारतीय संघात निवड करण्यात आली आहे.

तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतल्याने न्यूझीलंडच्या संघाचे मनोबल उंचावले आहे. भारतीय वंशाचा रचिन रवींद्र, डेव्हन कॉन्वे यांना चांगाल सूर गवसला असल्याने या कसोटीत सामन्यातही या दोघांकडून मोठ्या खेळीची अपेक्षा न्यूझीलंडचे संघ व्यवस्थापन करत असेल. मॅट हेन्री, टीम साऊदी व विल्यम्स या तीन वेगवान गोलंदाजांनी पहिल्या कसोटीत उत्कृष्ट गोलंदाजी केल्याने भारतावर त्यांना विजय मिळवणे शक्य झाले आहेयपहिल्या कसोटीच्या दुसऱ्या डावात टीम इंडियाने पलटवार केला. नवोदित सर्फराज खानने शानदार शतक झळकले तर यष्टीरक्षक फलंदाज ऋषपंत शतक करण्यात अपयशी ठरला होता. तो ९९ धावांवर बाद झाला होता. मधल्या फळीतील फलंदाज केएल राहुल दोन्ही डावात अपयशी ठरल्याने त्याच्या जागी शुभमन गिलला संधी देण्याचा विचार संघ व्यवस्थापन नक्कीच करतक असेल. फलंदाजी मजबूत करण्याच्या दृष्टीने जर वॉशिंग्टन सुंदरला संधी दिली तर कुलदीप यादवला बाहेर बसावे लागले.

## सोन्याने ओलांडला ८० हजारांचा टप्पा; चांदी लाखाच्या पुढे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : सोने आणि चांदीच्या दरात दिवसेंदिवस वाढ होताना दिसत आहे. काल (दि.२३) पुन्हा एकदा सोने आणि चांदी या दोन्ही मौल्यवान धातूंच्या भावात वाढ झाली आहे. सोन्याचा दर थेट एक लाखाच्या पार गेला आहे. विशेष म्हणजे सोन्याच्या भावानेदेखील ८१ हजार रुपयांचा आकडा पार केला आहे.

सोने आणि चांदीचा दर आपल्या उच्चांकी पातळीवर गेला आहे. ताज्या माहितीनुसार चांदीचा भाव १५०० रुपयांच्या वाढीसह थेट एक लाख रुपये प्रति किलो ग्रॅमवर पोहोचला आहे. चांदीच्या दरात ही सलग पाचवी दरवाढ आहे. शुक्रवारी चांदीचा भाव ९९,५०० रुपये प्रति किलोग्रॅम होता. त्यानंतर आता सलग पाचव्या दिवश चांदीचा दर वाढला असून तो १.०१ लाख रुपये प्रति किलोग्रॅमवर पोहोचला आहे.सोन्याच्या भावातही सध्या वाढ झाली आहे. ८०,६०० रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचलं आहे. राजधानी दिल्लीच्या सराफा बाजारात सोन्याचा भाव मंगळवारी ३५० रुपयांच्या तेजीसह ८१,००० रुपये प्रति १० ग्रॅमवर पोहोचला.गेल्या काही दिवसांपासून सोने आणि चांदीच्या दरात वाढ होत आहे. यामागे अनेक कारणे सांगितली जात आहेत. सध्या सणासुदीचा काळ आहे. त्यामुळे या काळात भारतभरात दागिन्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी होते. लग्नसराईलाही सुरुवात होणार आहे.

जन्म असा लाभावा, देह चंदनाचा मिळावा ।
सहवास संपला तरी, सुगंध मात्र दरवळत रहावा ।।
कळविण्यास अत्यंत वाईट वाटते की,



**स्व.परिगाबाई सुखदेव सरोदे**

यांना मंगळवार, दि.१५/१०/२०२४ रोजी देवाज्ञा झाला आहे. तरी त्यांचा

**।। दशक्रियाविधी ।।**

गुरुवार, दि.२४/१०/२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजता होणार आहे.

-- ठिकाण --
रामेश्वर मंदिर परिसर
कायगाव टोके,
ता.गंगापूर, जि.छ.संभाजीनगर

दु:खांकित

विठ्ठल सुखदेव सरोदे (मुलगा) श्री.दिलीप सुखदेव सरोदे (मुलगा)
श्री.पोपट सुखदेव सरोदे (मुलगा) श्री.अर्जुन सुखदेव सरोदे (मुलगा)
सौ.भिमाबाई (कामिनी) रमेश वाहुरवाघ (मुलगी)

समस्त सरोदे परिवार व नातेवाईक

प्रवचन : ह.भ.प. ससाणे महाराज उक्कलगावकर यांचा सकाळी १० वा.प्रवचनाचा कार्यक्रम होईल